## सुनावणीचा दि. 21.11.2016

| अ.क्र | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3239/ 2015 | कॅप्टन, श्री. सुरेंद्र जगन्नाथ सुर्वे, -विर सैनानी- सायली, प्लॉट नं.202, एन-1, सेक्टर-बी- सिडको, औरंगाबाद- | ज.मा.अ. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | ज.अ.अ. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | 0 | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 2 | 2233/ 2014 | श्री.डॉ किरणकुमार रंगनाथ चक्करवार, रा. 52/2, नगरपालिका शाळेजवळ, सिंघानिया नगर, आर्णी रोड, | तहसीलदार -महसूल-, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 3 | 1963/ 2015 | श्री.हारुण बादशहाभाई तांबोळी, मु.पो. निघोज ता.पारनेर जि.अहमदनगर | महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की औरंगाबाद जि.औरंगाबाद | महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की औरंगाबाद जि.औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 4 | 1578/ 2015 | श्री. सुभाष बोरीकर, अध्यक्ष व श्री.नितीन गायकवाड, उपाध्यक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा | ज.मा.अ. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ज.अ.अ. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 5 | 3159/ 2015 | श्री. विनोद गोपीनाथ कोरके, रा. कश्मीर नगर, कांचनवाडी, औरंगाबाद | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्रमांक-1, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग , औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 6 | 2971/ 2015 | श्रीमती. मुमताज जहाँ बशीरशेख (दारुवाला), रा. पंचपीर चावडी, घर नं. 4639, दि. महिला अंबिका बँक समोर, अहमदनगर, जि. | ज.मा.अ. नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, औरंगाबाद | ज.अ.अ. तहसिलदार, तहसिल कार्यालय, औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 7 | 3127/ 2015 | श्री. सोनाजी रघुनाथ माने, रा. 47, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सुल, औरंगाबाद | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 8 | 2790/ 2015 | श्री. दत्ता पाटील काकडे, रा. टाकळी कोलते, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद | ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय टाकळी कोलते, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय फुलंब्री, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 9 | 2896/ 2015 | श्री. रायभान किसन उघडे, रा. 140, रामकृपा कॉलनी-म्हाडा-दर्गारोड, औरंगाबाद | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण, जि. औरंगाबाद | गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 10 | 1803/ 2015 | श्री. कारभारी बाबुराव निकम, रा. मु. पो. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | उप विभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| | | **सहायकाचे नांव व स्वाक्षरी** | | **लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी** | | |

| | | सुनावणीचा दि. 21.11.2016 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 11 | 2034/ 2015 | श्री. साहेबराव रामचंद्र शिरसाठ, रा. मु. पो. अलापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.म.अ. नायब तहसीलदार-महसूल- तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 12 | 2052/ 2015 | श्री. द्वारकादास वसंतराव शिसोदे, रा. मु. पो. म्हाडा कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | तालुका पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 13 | 2309/ 2015 | श्री. साहेबराव राजाराम पाटील, रा. वडगांव जाधव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | तलाठी, सज्जा, सायगव्हाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 14 | 2443/ 2015 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, द्वारा, श्री. मेडिकल, मेन रोड, समर्थ नगर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 15 | 2490/ 2015 | श्री. रविंद्र दौलतराव गायकवाड, रा. मु. पो. पळशी बु. ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 16 | 3001/ 2015 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, द्वारा-श्री.मेडीकल अँड जनरल स्टोअर्स, मेनरोड-कन्नड ता.कन्नड जि.औरंगाबाद | ज.मा.अ. तहसील कार्यालय, कन्नड ता.कन्नड जि.औरंगाबाद | तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड जि.औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 17 | 3147/ 2015 | श्री. विनोदकुमार रामप्रसाद भारुका, रा. कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | ज.अ.अ. तहसिल कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 18 | 1533/ 2015 | श्री. युवराज यादवराव बागुल, मु.पो.मकरणपूर ता.कन्नड जि.औरंगाबाद | ज.मा.अ. पंचायत समिती, कार्यालय, कन्नड ता.कन्नड जि.औरंगाबाद | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड जि.औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 19 | 1534/ 2015 | श्री. युवराज यादवराव बागुल, रा. मु. मकरंनपुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | गट विकास अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, ता. कन्नड,जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 20 | 1388/ 2015 | श्री. शशीकांत धोंडीराम गजहंस, रा. मु. सुलतानाबाद, पो. लासुर स्टेशन, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुलतानाबाद, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| | | **सहायकाचे नांव व स्वाक्षरी** | | **लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी** | | |

| सुनावणीचा दि. 21.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 21 | 2322/ 2015 | श्री. रायभान शेषराव शेलार, रा. मु. तीसगांव, पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | 0 | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 22 | 2323/ 2015 | श्री. रायभान शेषराव शेलार, रा. मु. तीसगांव, पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 23 | 2324/ 2015 | श्री. रायभान शेषराव शेलार, रा. मु. तीसगांव, पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 24 | 2325/ 2015 | श्री. रायभान शेषराव शेलार, रा. मु. तीसगांव, पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 25 | 2326/ 2015 | श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे, रा. मु. वडगांव-को., पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 26 | 2327/ 2015 | श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे, रा. मु. वडगांव-को., पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 27 | 2328/ 2015 | श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे, रा. मु. वडगांव-को., पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 28 | 2329/ 2015 | श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे, रा. मु. वडगांव-को., पो. वडदगांव, ता. जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घानेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 29 | 1808/ 2015 | श्री. दादासाहेब गजानन मांगे, रा. खोपेश्वर पो. सिध्दनाथ वडगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडळी, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 30 | 1450/ 2015 | श्री. गोवर्धन सुखदेव कोरडे, रा.मु. पो. खेडले कलाळी, ता. नेवासा, जि. अहमदनगर. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कायगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी - पंचायत, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

## सुनावणीचा दि. 21.11.2016

| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | 3079/ 2015 | श्री. संतोष भाऊसाहेब शिंदे, रा. शहापुर, पो. घोडेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सिध्दनाथ वडगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 32 | 2761/ 2015 | श्री. भालचंद्र रामराव साळुंके, रा. मु. पो. लासुर स्टेशन, ता. गंगापुर,जि. औरंगाबाद | उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक - 3, परंडा कार्यालय, गंगापुर, जि. औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, ना.म.कालवा, विभाग वैजापुर, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 33 | 3025/ 2015 | श्री. रामा बापू गावंडे, रा. आमखेडा ता.सोयगांव जि.औरंगाबाद | तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव जि. औरंगाबाद | उपविभागीय अधिकारी, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 34 | 2234/ 2015 | श्री. विनायक नारायण जोशी, रा. जी-1/9, कासलीवाल रेसिडेन्सी, प्रतापनगर, नवा उस्मानपुरा, जि. औरंगाबाद | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद | तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 35 | 2305/ 2015 | श्री. यशवंत पांडुरंगराव पवार, रा. प्लॉट नं. 28, दिशा नभांगण, संत तुकोबा नगर, एन-2, सिडको, औरंगाबाद | इंद्रराज महाविदयालय, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद | प्राचार्य, इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 36 | 3224/ 2015 | श्री. प्रकाश मुरलीधर प्रधान, रा. अंबेगांव, पो. आसेगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, ग्रामिण विदयुत भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, मिलकॉर्नर, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या., प्लॉट नं. जे-13, गरवारे स्टेडियमच्या समोर, एम.आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 37 | 1714/ 2016 | श्री. दिलीप शिवनारायण जैस्वाल, रा. घर नं.4-11-3, कुंभारवाडा, औरंगाबाद | ज.मा.अ. उप अभियंता, - (स्लम / बीओटी) महानगरपालीका, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, (ब/ई/फ), महानगरपालीका, औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 38 | 3205/ 2015 | श्री. मधुकर रायाजी रगडे, रा.संजय नगर, गल्ली नं. 3 घर नं.5-9-1404, वार्ड क्रमांक-84, मुकूंदवाडी,औरंगाबाद | जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(मर्या),जिल्हा कार्यालय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,खोकडपूरा, औरंगाबाद-2486071 | विभागीय व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या),विभागीय कार्यालय, देवनागरी जबिंदा कॉर्नर, शहानूर मियाँ दर्गा रोड,औरंगाबाद-2331833 | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 39 | 1439/ 2015 | श्री. दत्ता जेगा गेडाम, मु.लीमगुडा पो.पिंपळगांव-सा-ता.किनवट जि.नांदेड | मुख्याध्यापिका,संधि निकेतन संस्था वडगांव, दवारा-संचलित आदिवासी मुलीचे शैक्षणिक संकूल पिंपळगांव फाटा- ता.किनवट जि.नांदेड | सहाय्यक प्रकल्प अधिकारी-शिक्षण- एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प किनवट ता.किनवट जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 40 | 2907/ 2015 | श्री. गणेश एस.गंजरा, रा.घर क्रमांक 83 तोफखाना छावणी औरंगाबाद जि.औरंगाबाद | ज.मा.अ. अन्न धान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | ज.अ.अ. अन्न धान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| | | **सहायकाचे नांव व स्वाक्षरी** | | **लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी** | | |

| सुनावणीचा दि. 21.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 41 | 2898/ 2015 | श्री. रायभान किशन उघडे, रा. 140, रामकृष्ण कॉलनी-म्हाडा-दर्गा रोड, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, ना. न.-3., पैठण, जि. औरंगाबाद | सहायक अधिक्षक अभियंता, अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लाभक्षेत्र विकास [illegible] | 0 | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 42 | 2996/ 2015 | श्री. विनोदकुमार रामप्रसाद भारुका, राहणार-चापानेर-कन्नड ता.कन्नड जि.औरंगाबाद | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. चापानेर ता.कन्नड जि.औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. उपविभाग कन्नड जि.औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 43 | 2932/ 2015 | डॉ. प्रमोद एकनाथराव जाधव, रा. आर.एच-1, समर्थ हेरिटेज, मराठवाडा सांस्कृतिक मंडळासमोर, खडकेश्वर, [illegible] | अप्पर पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद | पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 44 | 2922/ 2015 | श्री. बाबासाहेब बापुराव लहाने, रा. मु. सुंदरनगर, एस.टी. वर्कशॉपच्या मागे, निळया झेंडयाजवळ, औरंगाबाद रोड, [illegible] | ज.मा.अ.प्रादेशिक परिवहन कार्यालय, स्टेशन रोड, औरंगाबाद | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, स्टेशन रोड, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 45 | 2943/ 2015 | श्री. देविदास रखमाजी तरवडे, रा. सजाई निवास, सदगुरु नगर, जुना औसा रोड, लातुर, जि. लातुर | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, औरंगाबाद | विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 46 | 3083/ 2015 | श्री. सतिष माधवराव नागरगोजे, रा. बालाजी नगर, घर नं. आय-227, औरंगाबाद | मुख्य लेखापाल, वन विभाग, औरंगाबाद | सहायक वन संरक्षक, संरक्षण व अतिक्रमनण निर्मुलन, वन विभाग, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 47 | 3113/ 2015 | श्री. परमेश्वर दामू काकडे, रा. प्लॉट नं.34, सुजाता कॉलनी, सौभाग्य चौक, जळगांव रोड, औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निपाणी, ता. जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी- पंचायत- पंचायत समिती, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 48 | 3190/ 2015 | श्री. रविंद्र शिवाजी गावंडे, रा. मु. मांगेगांव, पो. तळपिंप्री, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | जिल्हा क्रिडा अधिकारी, औरंगाबाद | उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 49 | 3085/ 2015 | डॉ. सैफुददीन अहेमद, रा. रहिम मार्केट, बसस्टँड अकोला, जि. अकोला-444001 | ज.मा.अ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद | ज.अ.अ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 50 | 3262/ 2015 | श्री. बाबासाहेब गोपीनाथ मैराळ, रा. मु.पो.भेंडाळा ता.गंगापूर जि.औरंगाबाद | ज.मा.अ. तहसील कार्यालय, गंगापूर जि.औरंगाबाद | तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर जि.औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| | | **सहायकाचे नांव व स्वाक्षरी** | | **लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी** | | |

| | | सुनावणीचा दि. 21.11.2016 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 51 | 3220/ 2015 | श्री. विलास जगदेवराव गवई, रा. मु. गल्ली नं. 72/2, घर नं. 9-ए, पार्ट-ए, एकनाथनगर, वंजारवाडी रोड, शरणपुर, पो. पडेगांव, ता. जि. औरंगाबाद- | ग्रामसेवक, ग्रामपंचायक कार्यालय शरणापुर, ता. जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 52 | 3223/ 2015 | श्री. विलास जगदेवराव गवई, रा. मु. गल्ली नं. 72/2, घर नं. 9-ए, पार्ट-ए, एकनाथनगर, वंजारवाडी रोड, शरणपुर, पो. पडेगांव, ता. जि. औरंगाबाद- | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शरणापुर, ता. जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 53 | 2931/ 2015 | श्री. संजिव आसाराम सुलाने, रा. मु. डोणगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, डोणगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 54 | 3296/ 2015 | श्री. प्रभाकर सांडु पारधे, रा. मु. पो. हटटी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबा-431112 | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय हटटी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद | विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 55 | 3097/ 2015 | श्री. आरेफ अली असीफ अली, रा. मु. पो. खिडकीका बंगला, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | ज.मा.अ. नगरपरिषद कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 56 | 2928/ 2015 | श्री. अंबादास तुकाराम बावस्कर, रा. एकतानगर, जटवाडा रोड, औरंगाबाद | ज.मा.अ. नगरपरिषद कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 57 | 3071/ 2015 | श्री. दिलदार खॉन इलियास खॉन, रा. रजा पॅलेस, नुरानी कॉलनी, जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर-413201 | सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 58 | 3072/ 2015 | श्री. दिलदार खॉन इलियास खॉन, रा. रजा पॅलेस, नुरानी कॉलनी, जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर-413201 | सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 59 | 3073/ 2015 | श्री. दिलदार खॉन इलियास खॉन, रा. रजा पॅलेस, नुरानी कॉलनी, जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर-413201 | सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 60 | 3293/ 2015 | श्री. पांडुरंग बळीराम बारड, रा. वसंतविहार, बिल्डिंग नं. 5, ब्लॉक नं. 101, गांधीनगर, डोंबिवली पुर्व, ता. कल्याण, जि. ठाणे | सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद | प्रशासन अधिकारी, विभागीय सह संचालक कार्यालय, औरंगाबाद | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| सुनावणीचा दि. 21.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 61 | 3200/ 2015 | श्री. सय्यद आरीफ सय्यद असद, रा. अंभाई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद | शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय- घाटी- औरंगाबाद | वैदयकिय अधिक्षक, शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय- घाटी- औरंगाबाद | 0 | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 62 | 3260/ 2015 | श्री. फिरोजखॉन अय्युब खॉन पठाण, रा. दर्गावेस, पोलीस स्टेशन रोड, वैजापुर, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद | वैदयकिय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय वैजापुर, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद | जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 63 | 2899/ 2015 | श्री. रवि हरिभाऊ चव्हाण, रा. मु. पो. आसेगांव वेण, ता. रिसोड, जि. वाशिम | उप प्रबंधक-प्रशासन, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद | प्रबंधक-प्रशासन, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 64 | 2992/ 2015 | श्री. माधवराव दिनकरराव सरगर, रा. मांडवा दु., ता. जि. परभणी | उप प्रबंधक-प्रशासन- उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | प्रबंधक-प्रशासन- उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 65 | 2991/ 2015 | श्री. माधवराव दिनकरराव सरगर, रा. मांडवा दु., ता. जि. परभणी | उप प्रबंधक-प्रशासन- उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | प्रबंधक-प्रशासन- उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 66 | 3093/ 2015 | श्री. जयकृष्ण ग्रोवर, रा. औरंगाबाद टेक्सटाईल्स अँड अपारेल पार्क लि., कोतवालपुरा, नॅशनल टेक्सटाईल्स कॉरपोरेशनचा | वॉर्ड अधिकारी-ड- महानगरपालिका, औरंगाबाद | कर निर्धाकर व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 67 | 3094/ 2015 | श्री. जयकृष्ण ग्रोवर, रा. औरंगाबाद टेक्सटाईल्स अँड अपारेल पार्क लि., कोतवालपुरा, नॅशनल टेक्सटाईल्स कॉरपोरेशनचा | वॉर्ड अधिकारी-ड- महानगरपालिका, औरंगाबाद | कर निर्धाकर व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 68 | 2908/ 2015 | श्री. यशवंत पांडुरंगराव पवार, रा. प्लॉट नं. 28, दिशा नभंगण, संत तुकोबा नगर, एन-2, सिडको, औरंगाबाद | ज.मा.अ. सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद | ज.अ.अ. सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 69 | 2914/ 2015 | अॅड. रमेश की. भालेराव, रा. सिडको एन-9, म्हाडा कॉलनी, रायगड नगर, प-लॅट क्रमांक आर-26/एम-13/51, औरंगाबाद-431003 | उप शिक्षण अधिकारी- प्राथमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | शिक्षण अधिकारी-प्राथमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 70 | 2962/ 2015 | अॅड रमेश कि. भालेराव, रा. सिडको एन-9, म्हाडा कॉलनी, रायगड नगर, प-लॅट क्रमांक आर-26/एम-13/51, औरंगाबाद-431003 | शिक्षण सहायक संचालक, विभागीय शिक्षण उप संचालक यांचे कार्यालय, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद | शिक्षण उप संचालक, विभागीय शिक्षण उप संचालक यांचे कार्यालय, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| | | सुनावणीचा दि. 21.11.2016 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 71 | 3146/ 2015 | श्री. आसाराम अनंतराव म्हेत्रे, रा. जिजामाता शिक्षण संस्था, सिंदखेड राजा, जि. बुलढाणा | प्रबंधक, देवगिरी महाविदयालय, औरंगाबाद | प्राचार्य, देवगिरी महाविदयालय, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 72 | 3159/ 2015 | श्री. रमेश कारभारी मोरे, रा. मु. घर नं. 4/32/585, गल्ली नं. 7, मोमोदिया उर्दु शाळेजवळ, न्यायनगर, गारखेडा परिसर, जि. | ज.मा.अ. शिक्षणाधिकरी-प्राथमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | ज.अ.अ. शिक्षणाधिकरी-प्राथमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 73 | 3199/ 2015 | श्री. बन्सीधर किशनराव शिंदे, रा. अक्षय निवास, क्रांतीनगर पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड | ज.मा.अ. शिक्षण उप संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | ज.अ.अ. शिक्षण उप संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 74 | 3242/ 2015 | श्री. मोहम्मद अझहर मोहम्मद अकबर, रा. घर नं. 4-10-74/1, सर सय्यद कॉलेजच्या बाजुला, रोशन | मुख्याध्यापक, राजधानी उर्दु हायस्कुल, औरंगाबाद | शिक्षणाधिकारी-माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 75 | 3255/ 2015 | श्रीमती शमा फिरदोस मोहम्मद हाजी, द्वारा डॉ. सय्यद सिददीकी साद कॉलेज, मदिना दुध डेअरी, रशिदपुरा, औरंगाबाद | मुख्याध्यापक, राजधानी उर्दु हायस्कुल, जसवंतपुरा, औरंगाबाद | शिक्षणाधिकारी-माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 76 | 3256/ 2015 | श्रीमती शमा फिरदोस मोहम्मद हाजी, द्वारा डॉ. सय्यद सिददीकी साद कॉलेज, मदिना दुध डेअरी, रशिदपुरा, औरंगाबाद | मुख्याध्यापक, राजधानी उर्दु हायस्कुल, जसवंतपुरा, औरंगाबाद | शिक्षणाधिकारी-माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 77 | 3257/ 2015 | श्रीमती शमा फिरदोस मोहम्मद हाजी, द्वारा डॉ. सय्यद सिददीकी साद कॉलेज, मदिना दुध डेअरी, रशिदपुरा, औरंगाबाद | मुख्याध्यापक, राजधानी उर्दु हायस्कुल, जसवंतपुरा, औरंगाबाद | शिक्षणाधिकारी-माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 78 | 3258/ 2015 | श्री. गाझी मुदस्सीर अहमद नुरुल्ला, द्वारा- असरफसाहब, हिना अपार्टमेन्ट जवळ, हिना नगर, रशिदपूरा, औरंगाबाद | मुख्याध्यापक, राजधानी उर्दु हायस्कुल, जसवंतपुरा, औरंगाबाद | शिक्षणाधिकारी-माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 79 | 3259/ 2015 | श्री. प्रमोद त्रिंबकराव भालेराव, रा. नरसिंह कॉलनी, गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | मुख्याध्यापिका, श्रीमती राजाबाई माधवलालजी धुत कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, गंगापुर, जि. औरंगाबाद | शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 80 | 3279/ 2015 | श्री. प्रमोद त्रिंबकराव भालेराव, रा. नरसिंह कॉलनी, गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | मुख्याध्यापिका, श्रीमती राजाबाई माधवरावजी धुत कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, गंगापुर, ता. गंगापुर, जि. | शिक्षणाधिकारी-माध्यमिक, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 81 | 3233/ 2015 | श्री. नारायण उत्तमराव मते, रा. देवहिवरा, ता.घनसावंगी जि.जालना | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | उपसचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

(1)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. ३२३९/२०१५

कॅ. सुरेंद्र जगन्नाथ सुर्वे (वीर सेनानी),
"सायली", प्लॉट नं. २०२, एन-१,
सेक्टर- 'बी'- सिडको-४३१ ००३, औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. ०५.०७.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. दोनही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि.२१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. बी.डी. म्हस्के, प्रभारी तहसीलदार (महसूल) व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. विश्वंभर गावंडे, निवासी उपजिल्हाधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"please give details of the Govt. land allotted to Ex-Army Subhedar Baburao N. Kale at village Maliwada, Tal. & Dist. Aurangabad as follows:

a) When (Year), and how much (Hectors) land was allotted to EX-Subhedar (Indian Army) Baburao Nanasaheb Kale at village Maliwada.

b) How and when the land allotted to Ex-Subhedar Baburao Kale was transferred to his wife, smt. Shevantabai Baburao Kale, please give फेर नंबर.

c) The Authority under which and when the land was transferred to her son, Vasant Baburao Kale. (संदर्भ फेर नंबर ९१) Please give copy of the letter from the Tahesildar, Giving approval of the transfer.

d) Please give copy of the application made by smt. Shevantabai Baburao Kale to transfer the land on the name of her only son, Vasant Baburao Kale.

e) Whether the Authority had made any verification regarding the actual legal heirs of Subhedar Baburao N. Kale before executing transfer of the entire land to Shri Vasant Baburao Kale and subsequently to his sons Manish Vasant Kale (संदर्भ फेर नंबर ६१७) and Ashish Vasant Kale (संदर्भ फेर नंबर १४६८) "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तहसीलदार, औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे नमूद करून अपिलार्थी यांचा अर्ज दि. १७.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे वर्ग करून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर मुदतीत कुठलाही प्रतिसाद मिळाला नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २९.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष अपिलार्थी यांनी त्यांचे दि. २१.११.२०१६ रोजीचे निवेदन आयोगासमोर सादर केले व आयोगासमोर कथन केले की, त्यांचे सासरे माजी सैनिक कॅ. बाबूराव एन. काळे यांना माजी सैनिक म्हणून मिळालेली सरकारी जमीन त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी श्रीमती शेवंताबाई बाबूराव काळे यांना व श्रीमती शेवंताबाई काळे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चार वारसांच्या नावे होण्याऐवजी फक्त त्यांच्या एका मुलाच्या नावे म्हणजे श्री. वसंत काळे यांच्या नावे फेरफाराद्वारे करण्यात आली व सदर जमीन त्याच कालावधीत त्यांच्यां मुलाच्या नावे करण्यात आली. ही बाब संशयास्पद दिसून येते. वरील घटना श्रीमती शेवंताबाई यांच्या निधनानंतर काही वर्षाने घडल्यामुळे अपिलार्थी यांच्या पत्नी ज्या की श्रीमती शेवंताबाई यांच्या कन्या आहेत त्यांच्यासह इतर वारसांवर अन्याय झाला आहे. सदर फेरफार चुकीच्या पद्धतीने झाला असल्याचे त्यांचे म्हणणे असून याबाबत दाद मागण्यासाठी त्यांना त्यासंदर्भातील कागदपत्रांची आवश्यकता आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर संदर्भित जमिनीचे फेरफार क्र. ९१, फेरफार क्र. ६१७ च्या प्रती अवलोकनास्तव सादर केल्या व कथन केले की, प्रकरणात अपिलार्थी यांनी उपविभागीय

अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे सदर जमीनीबाबत रीतसर अपील दाखल केल्यास त्यावर कार्यवाही होऊ शकेल. यावर अपिलार्थी यांनी याबाबत उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांचे अपील दाखल करून घेण्याबाबत सूचना देण्याची आयोगास विनंती केली. यासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र महसुल अधिनियम १९६० अन्वये महसुली अपील दाखल केल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आयोगास आश्वासीत केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांची जमिनीच्या फेरफारासंदर्भात काही तक्रार असल्याचे दिसून येते व उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन फेरफारामध्ये प्रथमदर्शनी विसंगतीही दिसून येते. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ नुसार महसूली अपील दाखल करून प्रकरणात दाद मागणे उचित राहील. यास्तव ही बाब अपिलार्थी यांना समजून देण्यात यावी व अपिलार्थी यांनी महसुली अपील दाखल केल्यास प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आश्वासीत केल्याप्रमाणे त्यावर यथोचित कार्यवाही होईल ही बाब जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी व्यक्तीशः पहावी, असे त्यांना अधिनियमातील कलम १९(८) (क) नुसार आयोगातर्फे कळविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**<u>आदेश</u>**

१. वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आश्वासीत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या महसुली अपिलासंदर्भात योग्य ती कार्यवाही होईल ही बाब व्यक्तीशः पहावी, असे त्यांना अधिनियमातील कलम १९(८) (क) नुसार आयोगातर्फे कळविण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6361 दि. 24-11-15

प्रत- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

(२)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २२३३/२०१४

डॉ. किरणकुमार रंगनाथ चक्करवार,
रा. ५२/२, नगरपालिका शाळेजवळ, सिघानिया नगर,
आर्णी रोड, यवतमाळ, जि.यवतमाळ : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये केलेले द्वितीय अपील राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दि. १७.०६.२०१४ रोजी प्राप्त झाले. सदर अपिलावर यापूर्वी दि. ०४.११.२०१५ व तदनंतर दि. ०७.०७.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात सद्यस्थिती अवगत होण्यासाठी तसेच दोनही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यासाठी आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. बी. डी. म्हस्के, प्रभारी तहसीलदार (महसूल) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१९.०९.२०१२ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ व सन २०११ या कालावधीत सिलींग मधील वाटप झालेल्या जमिनीबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) या औरंगाबाद उच्च न्यायालयाची WR. No. ७००/१७५ या सुप्रिम कोर्ट निकालाप्रमाणे दोन्ही निर्णयानंतर शासनाने केलेली कार्यवाही, मुख्यत्वे करून अपेक्षित माहिती म्हणजे मा. न्यायालयाचे दोन्ही निकालानंतर महाराष्ट्र राज्य ने कोणती कार्यवाही केली ते जाणून घेणे. वरील दोन्ही न्यायालयाच्या निकाल विशेष करून औरंगाबाद जिल्हयाकरिता दिलेले असल्यामुळे आपणाकडे

माहिती मागविलेली आहे. सोबत अतिविस्तृत स्वरुपाचे विनंती अर्ज जोडलेले असून न्यायालयाचे निकालपत्र व पेपरचे कात्रण सुद्धा जोडलेले आहे. अपेक्षित माहितीचा शोध घेण्याकरिता सोईस्कर होऊन त्वरित माहिती उपलब्ध व्हावी करिता पत्रोउपचार केला आहे. कृपया अग्रक्रम देवून माहिती अनिवार्य समजून शिघ्र टपालाद्वारे पाठवावी ही विनंती. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०८.११.२०१२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही व अपिलाबाबत निर्णयसुद्धा कळविलेला नाही"असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. १९.०९.२०१२ रोजीच्या जोडपत्र अ मधील माहितीसंदर्भात मागील दि. ०४.११.२०१५ रोजीच्या सुनावणी आदेशाद्वारे आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माजी खंडकरी शेतकऱ्यांना वाटप करावयाच्या जमिनीसंदर्भात शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ (सुधारणा) अधिनियम २०१२ मधील कलम २५-१ अअ मधील पोट कलम (३) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार दि. ०४.०५.२०१२ रोजीच्या परिपत्रकाची प्रत दि. २९.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविल्याबाबत आयोगासमोर निवेदन सादर केले.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांना माहिती प्राप्त झाल्यासंदर्भात शहानिशा होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याचे स्पष्ट होत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. याद्वारे त्यांनी कलम ७(१) चा भंग केलेला आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वत: उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

प्रस्तुत प्रकरणात आता अपिलार्थीस माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

३) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा जाणीवपूर्वक भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग

जावक क्र.-6497- दि.-23-12-15

③

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. १९६३/२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

श्री. हारुण बादशहाभाई तांबोळी,
मु. पो. निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २९.०५.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २०.०१.२०१६ व ०७.०७.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. मागील दि. २०.०१.२०१६ रोजी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. तदनंतर दि. ०७.०७.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

यांनी चौकशी करून अहवाल आयोगास सादर करावा, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी दि.२६.११.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे निघोज येथील खान मोहंमद दर्गा व मसजिद ट्रस्ट नं. बी.पी.टी.टी.आर. नं. बी/२५६ अहमदनगरबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) ट्रस्टची घटना, (२) नोंदणी अर्ज, (३) परिशिष्ट-१,(४) ट्रस्ट स्थापनेपासून वेळोवेळी मंजूर बदल अर्ज याबाबतची सर्व माहिती, (५) ट्रस्ट स्थापनेपासून २०१३ ते २०१४ पर्यंतचा ऑडीट रिपोर्ट."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २३.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २०.०२.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पाठविलेबाबत"असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवजावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र अ मध्ये एकूण ५ मुद्दे नमूद करून माहिती मागितली आहे. तथापि मुद्दा क्र. ५ ची माहिती अपिलार्थीस देय होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०२.२०१५ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी माहितीकरिताचे शुल्क टप्प्याटप्प्याने भरले असल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यानुसार माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र क च्या प्रयोजनामध्ये त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे या बाबीची शहानिशा होऊ शकली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रकरणात कलम ७(१) चा भंग दिसून येत नाही. तथापि कलम १९(६) चा भंग झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6495 दि. 23-12-15

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांनी निर्णयातील परिच्छेद क्र.१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल ३० दिवसात आयोगास सादर करावा.

(4)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. १५७८/२०१५

श्री. सुभाष बोरीकर, अध्यक्ष
व श्री. नितीन गायकवाड,उपाध्यक्ष,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
विभागीय मागासवर्गीय कर्मचारी संघटना, विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद : उत्तरवादी
२. प्रथम अपिलीय अधिकारी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०५.०५.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. ०७.०७.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी आज देखील अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराडवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी चौकशी करून अहवाल आयोगास सादर करावा, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी दि.१२.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"विद्यापीठ आस्थापनावरील सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वर्षनिहाय (दि. ०१/०१/२००५ पासून ते आजतागायत) सेवानिवृत्त झाल्या असल्याचा शेरा नमूद करण्यात आलेल्या

आपल्या कार्यालयात अद्ययावत बिंदुनामावली नोंद वहीच्या ठेवण्यात आलेल्या दुसऱ्या प्रतीच्या छायांकित सत्यप्रती "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १३.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये प्रयोजन नमूद केलेले नाही.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर यापूर्वी दि. ०७.०७.२०१५ रोजी सुनावणी झाली होती. या सुनावणी आदेशामध्ये अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पुढील सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास प्रकरणात एकतर्फी निर्णय घेण्यात येईल, अशी सूचना देऊन आयोगाने अंतरिम आदेशात विस्तृत विवेचन केले होते. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ च्या अपूर्णतेबाबतही आयोगाने भाष्य केले होते. अपिलार्थी मागील सुनावणीस अनुपस्थित होते. त्याचप्रमाणे आज रोजीही अनुपस्थित आहेत. यावरून अपिलार्थीस माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसून येते. या सर्व बाबी विचारात घेता,अपिलार्थी यांनी नव्याने कलम ६(१) नुसार परिपूर्ण जोडपत्र -अ जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल करावे, या निदेशासह विचाराधीन अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6485 दि. 23-12-15

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी निर्णयातील परिच्छेद क्र.१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल ३० दिवसात आयोगास सादर करावा.

(5)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. ३१६९/२०१५

श्री. विनोद गोपीनाथ कोरके,
रा. कश्मीर नगर, कांचनवाडी,
औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १,
औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १,
औरंगाबाद

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०५.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे तिघेही अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी चौकशी करून अहवाल आयोगास सादर करावा, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"Block Topping to barhale Hospital (paithan road) to Nath vally school in ward no. 98 at Aurangabad या कामाची वर्क ऑर्डर व M.B. रेकॉर्ड केलेल्या बिलांच्या छायांकित प्रती. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी तीस दिवस पूर्ण होऊनसुद्धा मी मागितलेली माहिती मला मिळाली नाही, असे नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०६.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " तीस दिवस पूर्ण होऊनसुद्धा मी मागितलेली माहिती मला मिळाली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6502 दि. 26-12-15

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी निर्णयातील परिच्छेद क्र.१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल ३० दिवसात आयोगास सादर करावा.

(6)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१

अपील क्र. २७७१/२०१५

श्रीमती मुमताज जहाँ बशीर शेख (दारुवाला), : अपिलार्थी
रा. पंचपीर चावडी, घर नं. ४६३९,
दि. महिला अंबिका बँक समोर,
अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे वडगव्हाण ता. जि. औरंगाबाद येथील गट नं. १८,१०१, ६३ फेर क्र. २ भूमी अभिलेख मधून गहाळ झाल्याबद्दल खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मौजे वडगव्हाण ता. जि. औरंगाबाद येथील गट नं. १८, ६३, १०१, ९१ मधील फेर क्र. २ आपल्या अभिलेख मध्ये सापडत नाही तसे पत्र ही भूमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद यांनी आम्हाला पाठविले आहे. १) फेर नं. २ प्रत रेकॉर्डला उपलब्ध नसल्यास गहाळ किंवा फाटले असल्यास ते पुनर्गठीत करण्यासंबंधीची कार्यवाहीची पद्धतीचे माहिती सदर माहिती अधिकारी यांनी पुनर्गठन करण्याऱ्या अधिकाऱ्याचे देणे नाव, पदनाम व कार्यालयाचा पत्ता देणे, गहाळ झालेले, फाटलेले जळालेले अभिलेख पुनर्गठित करणेसंबंधीची नियमावलीची माहिती देणे अट नं. १०१, १८, ९१,६३ चे फेर नं. २ मौजे वडगव्हाण ता. जि. औरंगाबाद येथील फेर नं. २ गहाळ झाले असून नंतर पुनर्गठित करणे कोणती कार्यवाही करण्यात आली, त्याची माहिती देण्यात यावी."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०२.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ३१.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " कोणतीही माहिती दिली नाही, माहिती देण्यास टाळाटाळ केली जातेय, अपिलाची कोणतीच माहिती देण्यात आली नाही व सुनावणीही घेण्यात आली नाही"असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने प्रतिसाद देऊन संबंधित कागदपत्रे अभिलेख विभागात आढळून येत नसल्याने देता येत नसल्याचे कळविले आहे. सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती शोध घेऊन उपलब्ध झाली आहे व काही माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही. त्या माहितीचा शोध घेऊन ती अपिलार्थीस देण्यात येईल. ही बाब विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेऊन निर्णय

पारीत करावा व सुनावणी दरम्यान अपिलार्थीस जन माहिती अधिकारी माहितीचा पुनश्च शोध घेऊन माहिती देतील, ही बाब पहावी, असे आयोगातर्फे निर्देशित करण्यात येत आहे.

प्रकरणात कलम ७(१) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर वर नमूद केल्याप्रमाणे सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून द्यावी. ही कार्यवाही त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र.--6518-- दि.--26-12-15--

(7)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. ३१२७/२०१५

श्री. सोनाजी रघुनाथ माने,
रा. ४७, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था,
हर्सुल, औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ०१.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. सतीश सोनी उपस्थित होते. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २६.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

> "क्र. २००७/जमा/२/कावि/तहसील कार्यालय औरंगाबाद दिनांक ३/१/२००८ रोजीचे पत्र मौजे तिसगाव ग.नं. १४० बाबत म.ज.म.अधिनियम १९६६ चे कलम १५५ प्रमाणे दुरुस्तीबाबतचे पत्र व त्यासंदर्भातील तलाठी यांनी दि. १३/११/२००७ रोजी दाखल केलेल्या अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत (तुकाराम राणू प्रधान यांचे संबंधी) "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही, म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ३०.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कथन केले की, फेर क्रमांक ८५५१ व ८८६१ ची छायाप्रत उपलब्ध आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली चतु:सिमेबाबतची माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस देण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसलेल्या माहितीबाबत अपिलार्थीस १५ दिवसात स्पष्टपणे कळवावे.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहितीसंदर्भात आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य कळवावे.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

(वसंत द. पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6474 दि. 23-12-16

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २८९६/२०१५

श्री. रायभान किसन उघडे, : अपिलार्थी
रा. १४०, रामकृपा कॉलनी-म्हाडा- दर्गारोड,औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. दोनही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्रीमती यु. डब्ल्यू मोरे, स.गट विकास अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १२.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे मुलानी वाडगाव ता. पैठण येथील प्लॉट व घर क्र. २४४ व २८१ वरील अवैध नोंदी प्रकरणी लोकशाही दिनातील तक्रार क्र. २२६ दि. २.०२.२०१५ चे उत्तरी पत्र क्र. ५०२ दि. २२.४.२०१५ मधील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) सदर प्रकरणात वापरण्यात आलेले मुद्रांक व वाटणीपत्र संमती पत्राचे वैधतेबद्दल अभिप्राय

२) मुद्रांक क्र. ६३/६ दि. ८.११.९५ प्रमाणे वाटणीपत्र दानपत्र बद्दल अपील अहवाल प्रत.

३) दि. ३०.१२.२०१० चे ठराव क्र. २६/६ मध्ये मुद्रांक (स्टॅम्प) चा वापराबद्दल अहवाल.

४) ग्रामसेवक व सरपंच यांचे जबाबाची प्रत.

५) मूळ मालकाचे अर्जाची प्रत, गावठाण प्रमाणपत्र प्रत.

६) दि. १५.८.२०१४ व १७.०९.१४ चे उपोषण अहवाल प्रत.

७) पैठण न्यायालयातील दाव्याची आपल्या कार्यालयाची प्रत.

८) सदर प्रत आपल्या कार्यालयास प्राप्त झाल्याचा पुरावा प्रत.

९) संबंधितास नोटीस (समन्स) देण्यात आल्याचा पुरावा प्रत. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तथापि या विषयाची माहिती लोकशाही दिनात केलेल्या तक्रार अर्जानुसार दिलेली असल्याचे नमूद केलेले आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १८.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद उपोषणाच्या अहवालासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी दिलेले पत्र हा उपोषण अहवाल म्हणून अपिलार्थीस देण्यात आला आहे. या संदर्भात अपिलार्थी यांचा आक्षेप आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये असा स्वतंत्र अहवाल उपलब्ध नाही. केवळ संदर्भित पत्रच उपलब्ध आहे. आयोगाने या अहवालाचे अवलोकन केले असता, तो स्पष्ट असून उपोषणाचा घटनाक्रम व त्यासंदर्भातील बाबींचा उल्लेख यामध्ये असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे पैठण न्यायालयीन दाव्याची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करून देण्यात आली. यावर अपिलार्थी यांनी ही प्रत पंचायत समिती कार्यालयात कुठून आली, अशी आयोगासमक्ष हरकत घेतली. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, चौकशी दरम्यान अपिलार्थी यांच्या बंधूंनी ही कागदपत्रे दाखल केली आहे. या कागदपत्रांवर जावक क्रमांकाची नोंद नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तथापि ही बाब प्रशासकीय असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांची उपलब्ध माहिती देण्यात आली आहे व त्यांचा परामर्ष आयोगाने घेतला आहे. तसेच सदर माहिती आयोगासमक्ष पुनश्च देण्यात आली. सबब

प्रकरणात अधिनियमातील कलम ७(१) चा जाणीवपूर्वक भंग नाही. तथापि कलम १९(६) चा भंग स्पष्टपणे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत सादर करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6484 दि. 23-12-15

८

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २७९०/२०१५

श्री. दत्ता पाटील काकडे,
रा. टाकळी कोलते, ता. फुलंब्री,
जि. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय टाकळी कोलते,
ता. फुलंब्री,जि. औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, फुलंब्री,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ३०.०७.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. दोनही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी चौकशी करून अहवाल आयोगास सादर करावा, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी दि. २५.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"सन २००५-२००६ सालाचे झोपडपट्टी धारकांच्या नोंदीचा उतारा"

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकार अर्जाप्रमाणे काही माहिती दिली नाही, असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २९.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " अपिलाच्या आदेशाप्रमाणे माहिती दिली नाही किंवा लेखी कळविले नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामधील 'ज्या अपिलाविरुद्ध अपील करावयाचे आहे, त्या निर्णयाची तारीख' या सदरामध्ये ज्या पत्रान्वये अपिलार्थीस आदेश प्राप्त झाला त्या पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद केलेला आहे. तथापि सदर निर्णयाची प्रत त्यांनी द्वितीय अपिलासोबत सादर केलेली नाही. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. सी. टी. इंगोले यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या १९(३) च्या प्रयोजनात आयोगास तथ्यांश आढळून येत आहे व अपिलार्थीचे अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. याद्वारे त्यांनी कलम ७(१) चा भंग केलेला आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

उपरोक्त विवेचनावरून सदर बाब स्पष्ट झालेली आहे की, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिले आहेत. त्यामुळे अपिलार्थी हे कलम १९(८)(ख) अन्वये नुकसान भरपाईस पात्र ठरत असून संबंधित प्राधिकरणाने अपिलार्थीस रु.५००/- नुकसान भरपाई धनाकर्षाने (डी.डी.) अदा करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी हे विलंबास जबाबदार असल्यास सदर आदेशाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करून ठेवावी.

५) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम 19(8)(b) अन्वये अपिलार्थीस ₹५००/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत धनाकर्षाद्वारे (डी.डी.) अदा करावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6475 दि. 23-12-15

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी निर्णयातील परिच्छेद क्र.१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल ३० दिवसात आयोगास सादर करावा.

(10)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. १८०३/२०१५

श्री. कारभारी बाबुराव निकम,
रा. मु. पो. पिशोर, ता. कन्नड,
जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
कन्नड, जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २२.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १८.०५.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१ व २३ सप्टेंबर, २०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन.व्ही. देशटवाड उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थीस माहिती देण्याकरिता मुदत देण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करून प्रकरणात दि. २२.११.२०१६ रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आली. त्यानुसार आज दि. २२.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. एन.व्ही. देशटवाड, नायब तहसीलदार (म-२) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची शेतजमीन ग.नं. ८६ मध्ये ०=७६ आर ग.नं. ९१ मध्ये ०=९८ आर व १३५ मध्ये ०=१३ आर या गटाचे गारपीट अनुदान मिळण्यासाठी खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" माझी जमीन १ हे. ८७ आर असून ती जमीन २ हे ४८ आर दाखवून मला गारपीट अनुदानापासून वंचित ठेवले.

वरील विषयी माहितीचा अधिकारात विनंती करतो की, मी अल्पभुधारक असून मला बहुभूधारक दाखवून मला सन २०१३-२०१४ च्या गारपीट अनुदानापासून वंचित ठेवले असून सदर तलाठी यांनी मला १ हे ८७ आर जमिनीचे अनुदान देण्यात यावे. नाही तर मला तलाठी रेकॉर्डला दाखविलेल्या अनुदान यादीतील क्षेत्र हे २=४८ आर. मला माझ्या ताब्यात व हक्कात करून दयावे. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०९.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती पाठविल्याच्या पत्राची प्रत तसेच माहे जानेवारी ते मार्च, २०१४ या कालावधीत अल्पभूधारक शेतकऱ्यांना पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीकरिता दिलेल्या अनुदानाबाबतची यादी सादर केली. यामध्ये अपिलार्थी यांच्या नावाचा समावेश असल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

जावक क्र. 6493 दि. 23-12-15



(अपील क्र १८०३/२०१५ २/२)

(11)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २०३४/२०१५

श्री.साहेबराव रामचंद्र शिरसाठ,
रा. मु. पो. अलापुर, ता. कन्नड,
जि. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ०४.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. आर. व्ही. शिंदे, नायब तहसीलदार (म-१) उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे

प्रतिनिधी श्री. एन.व्ही. देशटवाड, नायब तहसीलदार (म-२) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १२.०२.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मौजे अंधानेर गट नं. १४६- क्षेत्र ६० आर पैकी ३० आर जमिन खरेदी खत ८७६/२०१० अ.पा.क्र.वारसाचा फेर क्र. २६९९ वारस मुला-मुलींची सम्मती न घेता फेर क्र. ३४८८ कोणत्या अधिनियमाप्रमाणे मान्य करण्यात आला. इ. स्वरुपाची माहिती देणे.

वरील विषयान्वये सादर हे की, अ.पा.कसर्व वारसाचे एकत्र क्षेत्र असताना मुला-मुलींचे क्षेत्र कमी करण्याचा व त्याचा फेर घेण्याचा अधिकार कोणत्या नियमाप्रमाणे मा. तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांना फेर क्र. २४८८ ला मान्य करण्यात आले त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी मुद्याला अनुसरून माहिती न दिल्यामुळे अनावश्यक माहिती देऊन दिशाभूल केलेली आहे, असे नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०३.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २६.०३.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये शेतजमिनीच्या वारसाहक्कासंदर्भात माहिती मागितली आहे. त्यांची मूळ हरकत फेर क्र. ३४८८ बद्दल असून त्याबाबत त्यांचा आक्षेप असल्याचे दिसते. संबंधित फेरफाराबाबत काही हरकती असल्यास त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये महसूली अपील दाखल करू शकतात.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पृच्छात्मक व धोरणात्मक स्वरुपाची आहे. त्यामुळे त्यांना ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही. तथापि जमिनीसंदर्भात

प्रशासकीय स्वरुपाची तक्रार असल्याचे दिसते. या करिता त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये न्याय मागणे उचित ठरेल.

प्रकरणात अधिनियमातील कलम ७(१) व १९(६) चा जाणीवपूर्वक भंग झाल्याचे दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6508 दि. 26-12-15

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २०५२/२०१५

श्री. द्वारकादास वसंतराव शिसोदे, : अपिलार्थी
रा. मु. पो. म्हाडा कॉलनी, कन्नड,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका पुरवठा अधिकारी,
तहसील कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद
२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, कन्नड,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०५.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. मागील दि. २१.०९.२०१६ रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. आयलनवार जी. एम., नायब तहसीलदार व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. विनोद गुंडमवार, तहसीलदार व त्रयस्थ गंगासागर गॅस एजन्सीचे व्यवस्थापक श्री. कैलास शिंदे उपस्थित होते. प्रकरणात दोनही बाजूंना त्यांचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख दि. २३.०९.२०१६ अशी निश्चित करण्यात आली होती. तथापि दि. २३.०९.२०१६ रोजी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. डी. बी. निलावाड, ना.त. (पुरवठा) व विद्यमान जन माहिती अकिारी, श्री. आयलनवार जी. एम., ना.त.(पुरवठा) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १७.१२.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गंगासागर गॅस एजन्सीसंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.

ही माहिती गंगासागर गॅस एजन्सी संदर्भात असल्याने जन माहिती अधिकारी यांनी संबंधित गॅस एजन्सीला अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात दि. ३१.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०९.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १३.०५.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " मुदतीत कोणतीही माहिती दिली गेली नाही, कार्यवाहीबाबत कोणतीही सूचना नोटीस प्राप्त झाली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी मे. गंगासागर गॅस एजन्सी संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असून ही माहिती गॅस एजन्सीशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित गॅस एजन्सीला कळविले आहे. त्यानुसार गॅस एजन्सीने दि. २२.०४.२०१६ रोजी माहिती पुरविली आहे. संबंधित गॅस एजन्सी ही सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार उचित प्रतिसाद देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची होती. तथापि त्यांनी विहीत कालावधीमध्ये तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. प्रकरणात कलम ७(१) चा भंग दिसून येतो, परंतु शास्तीपात्र दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुर्दीच्या योग्य अंमलबजावणीचे भान ठेवणे आवश्यक आहे. तथापि अपिलार्थीस माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

---

जावक क्र. 6470 दि. 23-12-15

(13)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २३०९/२०१५

श्री. साहेबराव राजाराम पाटील,
रा. वडगाव जाधव,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
तलाठी, सजा सायगव्हाण,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीसलदार, कन्नड,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २२.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. दि. २१.०९.२०१६ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा सादर करण्याची संधी देण्यात येऊन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख दि. २३.०९.२०१६ अशी निश्चित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात आली. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. आर. व्ही. शिंदे, ना.त. व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन.व्ही. देशटवाड, ना.त.(म-२) उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मौजे वडगाव जाधव येथील ज्या निवडक शेतकऱ्यांना दुष्काळ सहाय्यता निधी सन २०१५ वाटप करण्यात आला त्यांच्या नावाची यादी List तसेच कोणता निकस लावून निधी वाटप करण्यात आला याची माहिती पाहिजे. "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. २८.०६.२०१५ रोजी देण्यात आलेल्या पत्राची प्रत सादर केली. त्यावर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याने समाधान झाले असल्याची पोच दिलेली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे, ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6503 दि. 26-12-10

(14)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २४४३/२०१५

श्री. प्रदिप बाबुलाल भारूका,
द्वारा श्री. मेडिकल, मेन रोड
समर्थनगर, ता. कन्नड,
जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, कन्नड,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०३.०७.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. मागील दि. २१.०९.२०१६ रोजीच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. तदनंतर दि. २३.०९.२०१६ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित राहिले. त्यामुळे प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन आज दि. २१.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. आर. व्ही. शिंदे, ना.त.(म-१) व विद्यमान

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन.व्ही. देशटवाड, ना.त.(म-२) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०१३ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"स.नं. २०४/१ अ च्या ७ ब प्रकरण बाबत व वहिती नोंद करून ७/१२ मिळणेबाबत "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी, 'माहिती देण्यात आली नाही', असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०१.०४.२०१३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २३.०३.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " राज्य माहिती आयोगाचे आदेश दि. २१.०९.२०१३ चा जन माहिती अधिकारी यांच्याकडून हेतूपुरस्सर अवमान, कर्तव्यात कसूर, दप्तर दिरंगाई, प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी टाळाटाळ, समक्ष रेकॉर्ड न ठेवता संचिकेमधून आवश्यक माहिती शोधून घ्या अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सूचना मिळाली. "असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, यापूर्वी अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलासंदर्भात राज्य माहिती आयोगाने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करण्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांना दि. १९.१२.२०१४ रोजीच्या निर्णयाद्वारे आदेशित केले होते. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०३.२०१५ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसते. या निर्णयामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना संचिकेतील कोणत्या कागदपत्रांची माहिती पाहिजे, याबाबत अवगत करावे, असे सांगितले असता त्यांनी अर्जासोबतच्या मुद्यांनुसार माहिती द्यावी, असे सांगून संचिकेतील माहिती घेण्यास नकार दिला व माहिती न घेता निघून गेले. यासंदर्भात आयोगाने अपिलार्थीस पृच्छा केली असता, अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना योग्य ती माहिती न देता, रेकॉर्डरुममधून संचिका शोधून आवश्यक ती माहिती घ्या, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. या सर्व बाबी विचारात घेऊन जन माहिती अधिकारी यांना संदर्भित संचिका आयोगासमोर सादर करण्याचे निदेश देऊन प्रकरणात पुढील सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी निश्चित करण्यात आली. दि.

२४.११.२०१६ रोजी सुनावणीसाठी केवळ अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अधिनियमातील कलम १९(८)(क) व १९(७) नुसार अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरीम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येइल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6470 दि. 23-12-15

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २४९०/२०१५

श्री. रविंद्र दौलतराव गायकवाड, : अपिलार्थी
रा. मु. पो. पळशी बु.,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, कन्नड,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०८.०७.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोनही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. यु. व्ही. लेकुरवाळे, नायब तहसीलदार (नि) उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ३१.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या आदेश जा.क्र. २०१४/ निवडणूक/तक्रार/कावि/३७ जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद दिनांक १०/०२/२०१५

२) एकच मतदार दोन ठिकाणी मतदार हक्क बजावत असल्यास या दोषी मतदाराला निवडणूक आयोगाकडून कोणत्या शिक्षेची तरतूद व या संबंधी नियमावलीची छायांकित प्रत शासकीय जि.आर. मिळणे बाबत"

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती न मिळाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २०.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती अ, ब पूर्तता न झाल्याने" असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी दि. २१.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांना एक आठवडयात माहिती देण्याचे निदेशित केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आज दि. २१.११.२०१६ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. प्रकरणात आता अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे, त्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती केवळ दोन पृष्ठांची असूनही अपिलार्थीस देण्यास विलंब झाला आहे, ही बाब खेदजनक आहे. त्यामुळे प्रकरणात अधिनियमातील कलम ७(१) चा जाणीवपूर्वक भंग झाल्याचे स्पष्ट होत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

उपरोक्त विवेचनावरून सदर बाब स्पष्ट झालेली आहे की, अपिलार्थीस माहिती प्राप्त करण्यास खेटया घालाव्या लागल्या. त्यामुळे अपिलार्थी हे कलम १९(८)(ख) अन्वये नुकसान भरपाईस पात्र ठरत असून संबंधित प्राधिकरणाने अपिलार्थीस रु.१,०००/- (रुपये एक हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई धनाकर्षाने (डी.डी.) अदा करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

३) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

४) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

५) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम १९(८)(ख) अन्वये अपिलार्थीस ₹१,०००/- (रुपये एक हजार मात्र) इतकी नुकसान भरपाईची रक्कम आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत धनाकर्षाद्वारे (डी.डी.) अदा करावी.

राज्य माहिती आयोग

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 28 दि. 4-1-17

(16)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. ३००१/२०१५

श्री. प्रदिप बाबुलाल भारूका,
द्वारा श्री. मेडिकल, मेन रोड
समर्थनगर, ता. कन्नड,
जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, कन्नड,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. व्ही. देशटवाड, नायब तहसीलदार (म-२) उपस्थित होते.अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. आर. व्ही. शिंदे, ना.त.(म-१) व विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन.व्ही. देशटवाड, ना.त.(म-२) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०१३ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"स.नं. २०४/१ अ च्या ७ ब प्रकरण बाबत व वहिती बंद करून ७/१२ मिळणेबाबत "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती देण्यात आली नाही, असे नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०१.०४.२०१३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यांच्याकडूनही अपिलाची दखल नाही तसेच राज्य माहिती आयोगाने दि. २१.०९.२०१३ रोजी आदेशित करूनही तहसीलदार, कन्नड यांनी कोणतीही माहिती दिली नाही व निर्णयही दिला नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, यापूर्वी अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलासंदर्भात राज्य माहिती आयोगाने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करण्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांना दि. २१.०९.२०१३ रोजीच्या निर्णयाद्वारे आदेशित केले होते. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०३.२०१५ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसते. या निर्णयामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना संचिकेतील कोणत्या कागदपत्रांची माहिती पाहिजे, याबाबत अवगत करावे, असे सांगितले असता त्यांनी अर्जासोबतच्या मुद्यांनुसार माहिती द्यावी, असे सांगून संचिकेतील माहिती घेण्यास नकार दिला व माहिती न घेता निघून गेले. यासंदर्भात आयोगाने अपिलार्थीस पृच्छा केली असता, अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना योग्य ती माहिती न देता, रेकॉर्डरुममधून संचिका शोधून आवश्यक ती माहिती घ्या, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. या सर्व बाबी विचारात घेऊन जन माहिती अधिकारी यांना संदर्भित संचिका आयोगासमोर सादर करण्याचे निदेश देऊन प्रकरणात पुढील सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी निश्चित करण्यात आली. दि. २४.११.२०१६ रोजी सुनावणीसाठी केवळ अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे प्रकरणात सुनावणी पुढे

ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अधिनियमातील कलम १९(८)(क) व १९(७) नुसार अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरीम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येइल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6488 दि. 23-12-15

(17)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. ३१४७/२०१५

श्री. विनोदकुमार रामप्रसाद भारुका, : अपिलार्थी
ता. कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, कन्नड,
जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, कन्नड,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०३.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन. व्ही. देशटवाड, नायब तहसीलदार (म-२) उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. प्रकरणात दोनही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. आर. व्ही. शिंदे, ना.त.(म-१) व विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन.व्ही. देशटवाड, ना.त.(म-२) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २७.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मा. तहसीलदार साहेब कार्यालयामधील पत्र दिनांक १६.०९.२०१४ रोजीचे पत्र मला दिनांक १७.१०.२०१४ रोजी मिळाले असून त्या पत्रा अनुषंगाने आजपर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे, याची सविस्तर माहिती देण्यात यावी "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कुठलीही माहिती मुदतीत न दिल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १४.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6473 दि. 23-12-15

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. १३८८/२०१५

श्री.शशीकांत धोंडीराम गजहंस,
रा. मु. सुलतानाबाद,
पो. लासुर स्टेशन, ता. गंगापुर,
जि. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, सुलतानाबाद,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २०.०४.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. ०३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. साळुंके, ग्रामसेवक व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. डी. टी. गवळी, विस्तार अधिकारी (पं.) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०२.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १३ व्या वित्तीय आयोगाअंतर्गत समाजमंदीर बांधकाम केलेल्या कामाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) समाज मंदीर बांधकामासाठी लागलेल्या सर्व वस्तुच्या जसे वाळू, सिमेंट, खडी, विटा व इतर साहित्याच्या बिलाच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या.

२) क्वॅलिटी कंट्रोलने चाचणी केलेल्या चाचणी अहवालाची झेरॉक्स प्रत मिळावी.

३) समाजमंदीर बांधकामावर काम केलेल्या मजुरांची नावे व मजुरी दिलेल्या हजेरी मस्टरची व धनादेशाच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या.

४) मोजमाप पुस्तिका व अंदाजपत्रकाच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या.

५) मा. गट विकास अधिकारी यांची कामाबाबत मानयता घेतलेल्या प्रमाणपत्राच्या व समाज मंदीराचा मिळकत क्रमांकाच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २३.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २६.०२.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसात माहिती द्यावी, असा निर्णय दि. २७.०४.२०१५ रोजी पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने "असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, सुलतानाबाद या गावात दोन समाजमंदीर असून एक समाजमंदीर सर्वसाधारण लोकवस्तीसाठी असून दुसरे समाजमंदीर दलित वस्तीसाठी आहे. गावामध्ये नव्याने कोणत्याही समाजमंदीराचे बांधकाम करण्यात आलेले नाही. केवळ या समाजमंदीरांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. याकरिता रु. ७१,४००/- इतका खर्च झालेला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे समाजमंदीर बांधकामाची माहिती मागितली आहे. त्यामुळे अपिलार्थीस असे बांधकाम झाले नसल्याचे कळविण्यात आले आहे. यावर अपिलार्थी यांनी असे कथन केले की, गावामध्ये समाजमंदीराचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०२.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन कळविले आहे की, सन २०१२-१३ मध्ये १३ वा वित्त आयोग

योजनेअंतर्गत समाजमंदीर बांधकाम झाल्याचे आढळून येत नाही. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश केले आहे. आयोगापुढील युक्तिवादावरून असे आढळून येत आहे की, समाजमंदीर दुरुस्तीवर रु. ७१,४००/- इतका खर्च करण्यात आला आहे. समाजमंदीर दुरुस्तीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती गंगापूर, श्री. डी. पी. गवळी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती योग्य असल्याचे शपथपत्र दोन आठवडयाच्या आत आयोगाकडे सादर करावे, असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**अंतरीम आदेश**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती गंगापूर, श्री. डी. पी. गवळी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती योग्य असल्याचे शपथपत्र दोन आठवडयाच्या आत आयोगाकडे सादर करावे.

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

जावक क्र. 6472 दि. 23-12-15

(21)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २३२२/२०१५

श्री. रायभान शेषराव शेलार,
रा. मु. तीसगाव, पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घानेगाव,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोनही बाजूस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्राम पंचायत हद्दीतील खरेदीखताच्या आधारे घेण्यात आलेल्या एकूण नोंदीचा तपशील, अशी माहिती मागितली आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०३.१०.२०१६ रोजीचे ग्राम विकास अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनाची प्रत सादर केली. सदर निवेदनामध्ये नमूद केले आहे की, "मी चार अर्ज देऊन माहितीचे अधिकारात वेगवेगळया विषयावर माहिती मागविली होती. मागविलेल्या संपूर्ण माहितीचे मी प्रत्यक्ष अवलोकन केले असून माझे समाधान झाले आहे. तरी मी केलेले अपील वापस घेत आहे." ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6501 दि. 23-12-15

(२२)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २३२३/२०१५

श्री. रायभान शेषराव शेलार,
रा. मु. तीसगाव, पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घानेगाव,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोनही बाजूस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्राम पंचायत नमुना नं. १ ते २७ ची माहे मार्च, २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीची तपशीलवार माहिती, अशी माहिती मागितली आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०३.१०.२०१६ रोजीचे ग्राम विकास अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनाची प्रत सादर केली. सदर निवेदनामध्ये नमूद केले आहे की, "मी चार अर्ज देऊन माहितीचे अधिकारात वेगवेगळया विषयावर माहिती मागविली होती. मागविलेल्या संपूर्ण माहितीचे मी प्रत्यक्ष अवलोकन केले असून माझे समाधान झाले आहे. तरी मी केलेले अपील वापस घेत आहे." ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6500 दि. 23-12-15

(23)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २३२४/२०१५

श्री. रायभान शेषराव शेलार,
रा. मु. तीसगाव, पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घानेगाव,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोनही बाजूस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहे २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीतील ग्रुप ग्रामपंचायत घाणेगाव एकूण कंपन्यांचा वसूल झालेला कराचा तपशीलवार हिशोब अहवाल, अशी माहिती मागितली आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०३.१०.२०१६ रोजीचे ग्राम विकास अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनाची प्रत सादर केली. सदर निवेदनामध्ये नमूद केले आहे की, "मी चार अर्ज देऊन माहितीचे अधिकारात वेगवेगळया विषयावर माहिती मागविली होती. मागविलेल्या संपूर्ण माहितीचे मी प्रत्यक्ष अवलोकन केले असून माझे समाधान झाले आहे. तरी मी केलेले अपील वापस घेत आहे." ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6498 दि. 23-12-15

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २३२५/२०१५

श्री. रायभान शेषराव शेलार, : अपिलार्थी
रा. मु. तीसगाव, पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घानेगाव,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोनही बाजूस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च, २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीची गावठाण हद्दीतील खरेदी-विक्रीसाठी देण्यात आलेल्या गावठाण प्रमाणपत्राचा सत्यप्रती, अशी माहिती मागितली आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०३.१०.२०१६ रोजीचे ग्राम विकास अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनाची प्रत सादर केली. सदर निवेदनामध्ये नमूद केले आहे की, "मी चार अर्ज देऊन माहितीचे अधिकारात वेगवेगळया विषयावर माहिती मागविली होती. मागविलेल्या संपूर्ण माहितीचे मी प्रत्यक्ष अवलोकन केले असून माझे समाधान झाले आहे. तरी मी केलेले अपील वापस घेत आहे." ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6499 दि. 23-12-16

(25)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २३२६/२०१५

श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे, : अपिलार्थी
रा. मु. वडगाव-को., पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घाणेगाव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळेस सुनावणी घेण्यात आली होती. मागील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आज सुनावणीपूर्वी तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली. तथापि प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी ते आयोगासमोर अनुपस्थित राहिले.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत मार्च, २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीची ग्रामपंचायत घाणेगाव (ग्रुप) हद्दीमधील एकूण कंपन्याची यादी, अशी माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी "माहिती मिळाली नाही", असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०७.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. २७.०३.२०१५ रोजीच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6520 दि. 26-12-15

(26)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २३२७/२०१५

श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे,
रा. मु. वडगाव-को., पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घाणेगाव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळेस सुनावणी घेण्यात आली होती. मागील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आज सुनावणीपूर्वी तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली. तथापि प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी ते आयोगासमोर अनुपस्थित राहिले.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये माहे २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत हद्दीतील नोटरीच्या आधारे घेण्यात आलेल्या एकूण नोंदीचा तपशील-अशी माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी "माहिती मिळाली नाही", असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०७.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. २७.०३.२०१५ रोजीच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद (शिक्का)

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6509 दि. 26-12-15

(27)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २३२८/२०१५

श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे,
रा. मु. वडगाव-को., पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घाणेगाव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळेस सुनावणी घेण्यात आली होती. मागील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आज सुनावणीपूर्वी तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली. तथापि प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी ते आयोगासमोर अनुपस्थित राहिले.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मार्च, २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीच्या ग्रामपंचायत अंतर्गत मग्रारोहयोचा वार्षिक कृती आराखडा, मग्रारोहयोअंतर्गत घेण्यात आलेले ठराव, (एम.बी. मेजरमेंट बुक) नमुना नं. १ च्या सत्यप्रती, नमुना नं. ४ च्या सत्यप्रती, मग्रारोहयोचे मंजूर झालेल्या कामाचे इस्टीमेटची सत्यप्रत-अशी माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी "माहिती मिळाली नाही", असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०७.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. २७.०३.२०१५ रोजीच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6519 दि. 26-12-15

(28)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २३२९/२०१५

श्री. जितेंद्र हरिभाऊ दहातोंडे,
रा. मु. वडगाव-को., पो. वडदगाव,
ता. जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, घाणेगाव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २१.०९.२०१६ व २३.०९.२०१६ अशी दोन वेळेस सुनावणी घेण्यात आली होती. मागील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आज सुनावणीपूर्वी तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस. बी. बनकर, ग्रामसेवक, घाणेगाव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. व्ही. शेंगुळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, गंगापूर यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली. तथापि प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी ते आयोगासमोर अनुपस्थित राहिले.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत अंतर्गत १३ वा वित्त आयोग, दलित वस्ती, ग्राम निधी या योजनेशी निगडीत घेण्यात आलेले ठराव, मंजूर झालेले ठराव, अंमल बजावणी झालेले ठराव, पूर्ण झालेल्या कामाचे (एम.बी.) इस्टीमेटच्या मार्च, २०११ ते मार्च, २०१५ या कालावधीच्या प्रती-अशी माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी "माहिती मिळाली नाही", असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०७.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. २७.०३.२०१५ रोजीच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6506 दि. 26-12-10

(30)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. १४५०/२०१५

श्री. गोवर्धन सुखदेव कोरडे,
रा. मु. पो. खेडले काजळी,
ता. नेवासा, जि. अहमदनगर : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय कायगाव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०४.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. ०३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एस.जी. गाडेकर, ग्रामसेवक व विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. एस.व्ही. चोथे, ग्रामसेवक व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. एम. सी. कुंटे, विस्तार अधिकारी (पं.) उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना कालावधी देण्यात येऊन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्रीमती शेटे एस. व्ही., विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. एस. टी. चोथे, ग्रामसेवक व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. एम. सी. कुंटे, विस्तार अधिकारी (पं) व तत्कालीन सरपंच श्री. अशोक केशव चित्ते उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ श्री. नामदेव नाथू म्हस्के( मयत) यांच्या जमिनीबाबत नमुना नंबर ८ च्या उताऱ्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"श्री. नामदेव नाथू म्हस्के, रा. कायगाव हे यांचा मृत्यू दि. २८.०९.१९९८ रोजी मृत्यू झाला. त्यांची ग्रामपंचायत केंद्र येथे नोंद आहे. तरी त्यांचे नाव वगळता मिळकत नं. ४८ मध्ये नाव वारस म्हणून १) श्रीमती साखरबाई नामदेव म्हस्के, (२) उत्तम पांडुरंग म्हस्के, (३) रुस्तुम पांडुरंग म्हस्के यांची नोंद कोणत्या आधारे लावली गेली, तिची प्रत"

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ३०.०५.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १०.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १०.०४.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये प्रयोजन नमूद केलेले नाही.

यापूर्वी या प्रकरणात आयोगाने दि. ०३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या अंतरीम आदेशान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर जि. औरंगाबाद यांनी ग्रामपंचायत, कायगाव ठराव क्रमांक ०७ दि. २८.०७.२००९ चे सूचक, अनुमोदक व सचिव तथा ग्रामसेवक यांची पुढील सुनावणीस उपस्थित राहण्याचे निर्देशित केले होते. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजीच्या सुनावणीस ग्रामपंचायत, कायगावचे सचिव तथा ग्रामसेवक व सूचक श्री. अशोक चित्ते, तत्कालीन सरपंच उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आयोगासमोर कथन केले की, कायगाव येथील मिळकत क्र. ४८ च्या फेरफारासंदर्भात आक्षेप आहे. मिळकत क्र. ४८ चे मूळ मालक मयत झाले आहेत. त्यानंतर ग्रामपंचायत स्तरावर त्यांच्या वारसाबाबत चुकीचा ठराव घेण्यात आलेला आहे. वारस ठरविण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयास आहे. तथापि ग्रामपंचायतीने या प्रकरणात सरपंचाच्या प्रमाणपत्रानुसार वारसाची नोंद घेतली. ही बाब बेकायदेशीर असून त्यामुळे इतर वारसांवर अन्याय झाला आहे. त्यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे यासंदर्भातील कागदपत्रांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.

विस्तार अधिकारी (पं.) यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सदर ठराव बेकायदेशीर असल्याचे प्रतिपादन करून कथन केले की, अपिलार्थी यांनी दिवाणी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र सादर केल्यास नोंदीमध्ये दुरुस्ती करून घेण्यात येईल व यापूर्वीचा ठराव रद्द करण्यात येईल.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखांची तपासणी करून अपिलार्थीस सात दिवसात पुरावे द्यावेत, असा निर्णय दिला आहे. या निर्णयाच्या विवेचनामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, मिळकत क्र. ४८ संदर्भात फेरफारची नोंद नमुना नं. ८ ला आहे. परंतु सदर फेरफार कसे झाले, याबाबतचे फेरफार रजिस्टर ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध नाही. या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने दि. ३०.०५.२०१५ रोजी विलंबाने माहिती दिली आहे. युक्तिवादावरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांची मिळकत क्र. ४८ चे वारसाहक्काबाबत नेमकी तक्रार आहे. चुकीच्या वारस नोंदीसंदर्भात ग्रामसभेने ठराव घेतला असून सूचक, अनुमोदक व नोंद घेणारे यांनी या बाबचे भान ठेवले नाही. मूलतः मयत झालेल्या व्यक्तीचे वारस लावण्याचे अधिकार दिवाणी न्यायालयाचे आहेत. अपिलार्थीने दिवाणी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र मिळवून सादर केल्यास त्यावर ग्रामसभेत नियमानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासीत केले. .

अपिलार्थीस माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. प्रकरणात कलम ७(१) व १९(६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग

जावक क्र. 6480 दि. 23-12-15

(31)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. ३०७९/२०१५

श्री. संतोष भाऊसाहेब शिंदे, : अपिलार्थी
रा. शहापुर, पो. घोडेगाव, ता. गंगापूर,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र,
सिद्धनाथ वडगाव, ता. गंगापूर,
जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी सादर करण्याकरिता आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, डॉ. सि. पी. बिऱ्हाडे, वैद्यकीय अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, डॉ. बी. टी. जमादार, जिल्हा आरोग्य अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१७.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "आरोग्य सखी" या पुरस्काराचे निकष व हा पुरस्कार कोणत्या कामाच्या आधारे दिला जातो याबाबत माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. २५.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या या माहिती अर्जासह इतर तीन माहिती अर्ज असे एकूण चार माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसाठी शुल्क रु. २०,८६६/- भरण्याबाबत अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २५.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १७.०७.२०१५ निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती न देणेबाबत"असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः दि. २५.०५.२०१५ रोजी माहितीकरिताचे शुल्क कळविले आहे. तदनंतर दि. १७.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसून NRHM या कार्यालयाशी संबंधित आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १७.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन "आरोग्य सखी हा पुरस्कारच नसून जिल्हा स्तरावरून दिलेला नाही," असे नमूद करुन अपील निकाली काढले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास कथन केले की, आरोग्य विभागाच्या पुरस्कारांचे निकष आयुक्त, कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM ) ठरवित असतात. पुरस्काराकरिता नावांची शिफारस प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवरून तालुका आरोग्य केंद्राकडे केली जाते व तदनंतर ती जिल्हा पातळीवर पाठविली जाते. त्यामुळे आरोग्य सखी पुरस्कारासंदर्भातील निकषाची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध नाही.

युक्तिवादा दरम्यान आयोगासमोर आलेल्या उपरोक्त बाबींचा उल्लेख प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांना याची जाणीव करून देण्यात येऊन आयोगातर्फे तंबी देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य माहिती न दिल्यामुळे अपिलार्थी यांना आयोगाकडे द्वितीय अपील करणे भाग पडले व त्यांचा व्यर्थ कालापव्यय झाला

आहे. त्यामुळे अपिलार्थी हे कलम १९(८)(ख) अन्वये नुकसान भरपाईस पात्र ठरत असून संबंधित प्राधिकरणाने अपिलार्थीस रु.१,०००/- नुकसान भरपाई धनाकर्षाने (डी.डी.) अदा करावी.

प्रकरणात अधिनियमातील कलम ७(१) व १९(६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम १९(८)(ख) अन्वये अपिलार्थीस ₹१,०००/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत धनाकर्षाद्वारे (डी.डी.) अदा करावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6487 दि. 23-12-15

(32)

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २७६१/२०१५

श्री. भालचंद्र रामराव साळुंके, : अपिलार्थी
रा. मु. पो. लासूर स्टेशन,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे विभाग क्रमांक ३,
परंडा कार्यालय, गंगापूर,
जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ना.म.कालवा विभाग, वैजापूर,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

### निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २९.०७.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. प्रकरणात दोनही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी, श्रीमती ए. ए. वाघमारे, स.अ.श्रेणी-एक,ना.म.पां.उपविभाग क्र.४, गंगापूर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०८.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.०४.२०१५ पासून ना.म.का. विभागाने गंगापूर तालुक्यासाठी सोडलेल्या तिसऱ्या आर्वतनाची मांजरी येथील वितरीका क्र. दोन (वाय टू) ला सोडलेले पाणी वितरीका फोडून नाल्याकडे वळविणाऱ्या शेतकऱ्यांवर केलेल्या कार्यवाही संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"दि. ३०.०४.२०१५ रोजी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणती कार्यवाही केली. त्या कार्यवाहीचा अहवाल देणे. संबंधित वितरीका क्र. वाय टू दोन सुं. ब. साळुंके- मिसाळ यांच्या शेतातून जाणाऱ्या वितरीकेची व्यवस्था व देखरेख ज्या अधिकाऱ्यांवर कार्यकारी अभियंता ना.म.कां. वैजापूर यांनी आदेश देऊनही कार्यवाही करण्यात आली नाही. त्याचा लेखी खुलासा देणे.

संपूर्ण वितरीका संबंधित अधिकाऱ्यासमक्ष फोडून नाल्याकडे पाणी वळविणाऱ्या शेतकऱ्यांचा वरिष्ठांना दिलेल्या अहवालाची सत्यप्रत देणे. यापुढे आवर्तनापासून वंचित राहू नाही यासाठी जी प्रशासकीय कार्यवाही करणार त्याचा लेखी स्वरुपात हमी देण्यात यावी. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०८.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०८.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०६.०७.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. ०८.०६.२०१५ रोजी प्रतिसाद दिला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. ०६.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसात माहिती द्यावी, असा निर्णय दिला आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष कथन केले की, पाणी वाटप संस्थेचे पदाधिकारी वितरीका फोडून त्यांच्या शेतात पाणी वळवितात. त्यामुळे इतर शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे त्यांनी माहिती अर्जाद्वारे यासंदर्भात माहिती मागितली आहे व त्यांना ही माहिती तसेच यासंदर्भात सद्यस्थितीतील माहितीची आवश्यकता आहे. यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासित केले की, अपिलार्थी यांच्या तक्रारीची दखल घेऊन महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम (सुधारणा), १९७६ नुसार संबंधित

शेतकऱ्याना नोटीस बजावण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. त्याचप्रमाणे अपिलार्थीस सद्यस्थितीची माहिती व त्यांच्या जोडपत्र अ मधील माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

अपिलार्थीस माहिती दिली असल्याने विचाराधीन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रकरणात कलम ७(१) व १९(६) चा भंग दिसून येत नाही.

**आदेश**

१) वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या प्रपत्र अ प्रमाणे तसेच प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात नोंदणीकृत डाकेने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6565 दि. 26-12-15

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा), औरंगाबाद

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. ३०२५/२०१५

श्री. रामा बापू गावंडे,
रा. आमखेडा, ता. सोयगाव,
जि. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, सोयगाव, जि. औरंगाबाद : उत्तरवादी
२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २४.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित नव्हते. त्यामुळे अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन. के. मोरे,नायब तहसीलदार उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" १) सन २०१४ ते २०१५ पर्यंत आमखेडा येथे रॉकेल विक्री परवाना किती व्यक्तीकडे आहे. त्यांची नाववाईज माहिती देणे. २) आमखेडा येथील प्रत्येक रॉकेल विक्री परवानाधारकाकडे किती लाभ लाभार्थी आहेत. त्यांची नाववाईस माहिती देणे. ३) आमखेडा येथील स्वस्तधान्य दुकानदाराकडे

ए.पी. एल. बी. पी. एल.अंतोदय किती शिधापत्रिका आहेत. त्यांची नाववाईस माहिती देणे. ४)आमखेडा येथे प्रत्येक सिधा पत्रिकेत किती लाभार्थी आहेत. त्यातील प्रत्येक व्यक्तीस किती धान्य देण्यात येते. त्याची माहिती देणे. ५) आमखेडा येथे स्वस्त धान्य दुकानदाराकडे ए.पी.एल. बी.पी.एल. अंतोदय व इतर योजनेअंतर्गत दर महा किती क्विंटल धान्याचा पुरवठा केला जातो, त्याची माहिती देणे. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०८.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांच्या दि. ०२.०६.२०१५ रोजीच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णयही पारीत केलेला नाही. ही बाब विचारात घेता अपील मंजूरीस पात्र ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्याने ही माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र.

केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6495 दि. 23-12-15

(34)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २२३४/२०१५

श्री. विनायक नारायण जोशी,
रा. जी-१/९, कासलीवाल रेसिडेन्सी,
प्रतापनगर, नवा उस्मानपुरा, जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय सिल्लोड,
जि. औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, सिल्लोड,
जि. औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १६.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी चौकशी करून अहवाल आयोगास सादर करावा, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी दि.१०.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग. क्र. १३४, मौजे वडोद चाथा येथील फेरफार क्र. १४९५ बाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"भिमराव एकनाथ मापारी व जिजाबाई शामराव मापारी यांनी ज्या कागदपत्राच्या आधारे १४९५ फेर ७/१२ ला घेतला आहे. त्या कागदपत्राची संचिका देण्यात यावी."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २३.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन कळविले आहे की, "आपण मागितलेली माहिती सन १९९२ मधील असून त्यांच्या कार्यालयातील रेकॉर्ड विभागात ही माहिती शोधली असता आढळून आली नाही. करिता आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे."

तदनंतर अपिलार्थी यांनी नायब तहसीलदार यांच्या निर्णयाने व्यथित झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १०.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती दिली नाही व सुनावणीची कारवाई वेळेवर केली नाही. "असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील संचिका रेकॉर्ड विभागात आढळून आली नाही, असा प्रतिसाद दिला आहे. ही बाब आयोगास योग्य दिसून येत नाही. कारण सदर अभिलेख हा स्थायी स्वरुपाचा आहे, त्यामुळे त्याचे जतन करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च एकदा अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा त्यांच्या अभिलेख्यांमध्ये शोध घेऊन तो अपिलार्थीस उपलब्ध करून द्यावा, ही कार्यवाही त्यांनी पंधरा दिवसात पूर्ण करावी, त्याचप्रमाणे सदर अभिलेखांचा आढळ न झाल्यास संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार एफ.आय.आर. दाखल करावा, असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले असून जाणूनबुजून चुकीची, दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे स्पष्ट होत आहे. याद्वारे प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) भंग झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(ग) व कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात आयोगासमक्ष स्वतः उपस्थित राहून सादर करावे.

प्रकरणात अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही. याद्वारे त्यांनी कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

उपरोक्त विवेचनावरून सदर बाब स्पष्ट झालेली आहे की, अपिलार्थीस माहिती प्राप्त करण्यास खेटया घालाव्या लागल्या. त्यामुळे अपिलार्थी हे कलम १९(८)(ख) अन्वये नुकसान भरपाईस पात्र ठरत असून संबंधित प्राधिकरणाने अपिलार्थीस रु.१,०००/- नुकसान भरपाई धनाकर्षाने (डी.डी.) अदा करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहितीचा शोध घेऊन उपलब्ध माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून करावा.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

५) वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व कलम १९(६) किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे निश्चित करून त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

६) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम १९(८)(ख) अन्वये अपिलार्थीस ₹१,०००/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत धनाकर्षाद्वारे (डी.डी.) अदा करावी.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6507 दि. 26-12-18

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी निर्णयातील परिच्छेद क्र.१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल ३० दिवसात आयोगास सादर करावा.

(35)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. २३०५/२०१५

श्री. यशवंत पांडुरंगराव पवार, : अपिलार्थी
रा. प्लॉट नं. २८,
दिशा नभांगण, संत तुकोबा नगर,
एन-२, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड,
ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद
२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिल्लोड, जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २०.०६.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येउन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. किरण अ. राजपूत, कार्यालयीन अधीक्षक व प्रथम अपिलीय अधिकारी, डॉ. शिवाजी सांगळे, प्राचार्य, इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२८.०१.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे इंद्रराज महाविद्यालय सिल्लोड येथील विज्ञान शाखेतील अनूदानीत पदावर कार्यरत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) मा. सहसंचालकाचे भरती करवण्यासाठीचे ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत,

२) संबंधित कर्मचाऱ्यांच्या भरती संदर्भात वृत्तपत्रातील देण्यात आलेली जाहिरातीची प्रत.

३) संबंधित कर्मचाऱ्यांची मा. सहसंचालक कार्यालयाकडून मिळालेल्या मान्यतेचे प्रत. "

अपिलार्थी यांचा सदर दि. २८.०१.२०१५ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्षात दि. २३.०२.२०१५ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १९.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहिती देण्याचे नाकारले आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिलाच नाही. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी असंबंधित न्यायालयीन खटल्यांचे चुकीचे अर्थनिर्वचन करुन जाणीवपूर्वक माहिती नकारल्यामुळे, असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २०.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. तथापि या अपिलासंदर्भात दि. १८.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीसंदर्भात कळविल्याचे दिसून येते. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक माहिती दडवून ठेवली, अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. ०३.१०.२०१२ रोजी एसपीएल लीव पिटीशन नं. २७७३४/२०१२ गिरीश रामचंद्र देशपांडे विरुद्ध केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात व मा. कर्नाटक उच्च न्यायालयाने श्री. एच.ई. राजसरकरप्पा विरुद्ध राज्य जन माहिती अधिकारी या प्रकरणात दिलेल्या निर्णयांचा संदर्भ नमूद करून नाकारली आहे. तथापि अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ चे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भात माहिती मागितली असल्याचे दिसून येते. ही माहिती वैयक्तिक स्वरुपाची नसून सार्वजनिक स्वरुपाची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास सुयोग्य दिसून येत नाही. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने दि.



राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

०८.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती संदर्भात सविस्तर कळविल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**<u>आदेश</u>**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6977 दि. 23-12-15

(36)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. ३२२४/२०१५

श्री. प्रकाश मुरलीधर प्रधान,
रा. अंबेगाव, पो. आसेगाव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
ग्रामीण विद्युत भवन,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
मिलकॉर्नर, औरंगाबाद
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या.
प्लॉट नं. जे-१३,
गरवारे स्टेडियमच्या समोर,
एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. एम. एस. देशमुख, उपकार्यकारी अभियंता, ग्रा.उ.१, विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. बी. डी. चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. एन. आर. गांधंले, कार्यकारी अभियंता, म.रा. वि.वि.कं.म., चिकलठाणा उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२०१५ रोजी आयोगास द्वितीय अपिलासोबत दिलेल्या निवेदनावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद सादर करण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री.

बी. डी. चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. एन. आर. गांधंले, कार्यकारी अभियंता, महावितरण ग्रामीण विभाग-१, एम.आय.डी.सी.चिकलठाणा, औरंगाबाद उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २३.०५.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे हैबतपुर ता. गंगापूर येथील शेत गट नं. ११ मध्ये दिलेल्या वीज जोडणीबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"श्री. प्रभाकर केशव साळवे यांनी मौजे हैबतपुर, ता. गंगापूर येथील शेत गट नं. ११ मध्ये विद्युत कनेक्शन घेण्यासाठी कोणकोणते कागदपत्रे दाखल केली त्याच्या सत्यप्रती व सदर विद्युत जोडणी कोणत्या निकषावर केली त्याचे स्पष्टीकरण कारण की सदर शेतजमीन सरकारी गायरान आहे. यापूर्वी कनिष्ठ अभियंता यांनी त्याबाबतची माहिती दिलेली नाही."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २५.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना कोणतीही माहिती अथवा कार्यवाहीचा अहवाल प्राप्त न झाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २१.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " कोणतीही माहिती न दिल्यामुळे" असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०६.२०१४ रोजी उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही. तथापि दि. १०.०८.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी उपकार्यकारी अभियंता, मराविविकं.म. ग्रामीण उपवि-१ औरंगाबाद यांना अपिलार्थी यांच्या अर्जात नमून तक्रारीसंदर्भात चौकशी करून त्यावर महावितरणच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करून अपिलार्थीस कळवावे, असे सूचित केले आहे.

आज रोजी सुनावणीमध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाने दिनांक २३.०९.२०१६ रोजीच्या सुनावणी दरम्यान सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या दि. १००९.२०१५ रोजीच्या निवेदनावर त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला. अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरून असे दिसून येत आहे की,

त्यांची महावितरणने गायरान जमिनीवरील विद्युत जोडणीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीविषयी आक्षेप आहे. ही प्रशासकीय स्वरुपाची बाब आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी संबंधित प्राधिकरणाकडे रीतसर तक्रार करणे योग्य राहील.

अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे, ही बाब विचारात घेता, ती निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रकरणात कलम ७(१) व १९(६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6471 दि. 23-12-15

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. १७१४/२०१५

श्री. दिलीप शिवनारायण जैस्वाल, : अपिलार्थी
रा. घर नं. ४-११-३,
कुंभारवाडा, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता (स्लम/बीओटी),
महानगरपालिका, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (ब/ई/फ),
महानगरपालिका, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ३०.०४.२०१६ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी, श्री. शेख कमर, उपअभियंता (स्लम/बीओटी) व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता, मनपा, औरंगाबाद उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित नव्हते. अपिलार्थी यांनी त्यांच्या निवेदनाद्वारे त्यांच्या वडिलांचे वार्षिक श्राद्ध असल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली होती. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. शेख कमर, उपअभियंता (स्लम/बीओटी) व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता, मनपा, औरंगाबाद उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०१.१२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) औरंगपुरा भाजी मंडई येथील पूर्वेकडील विद्यमान सरकारी रस्त्यावर होत असलेले भाजी मंडईचे बांधकाम थांबविण्यासंदर्भात व रस्त्याची जागा अबाधीत ठेवण्यासंबंधी आपले कार्यालयास दिनांक २६.१०.२०१५ आणि २९.१०.२०१५ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची प्रत/ आदेश मिळणेबाबत.

२) सामान्य जनतेने सादर केलेल्या तक्रार अर्जावर संबंधित अधिकाऱ्याने किती दिवसात कार्यवाही करणे अनिवार्य आहे या बाबतची माहिती तसेच शासनाची परिपत्रके मिळणेबाबत.

३) माझे उपरोक्त दोन्ही अर्ज प्रलंबीत ठेवणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम तसेच सदर अधिकाऱ्याने सदर दोन्ही अर्ज प्रलंबीत का ठेवले याचे कारण व संबंधित अधिकाऱ्यावर अर्ज निकाली काढण्यासाठी केलेल्या विलंबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची प्रत."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २९.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती पूर्णतः चुकीची व दिशाभुल करणारी आहे. जी माहिती अपेक्षिलेली आहे ती माहिती न देता इतर अर्धवट माहिती दिली. मागणी केलेल्या माहितीचा व दिलेल्या माहितीचा अर्थाअर्थी संबंध नाही, असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०२.०१.२०१६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३०.०३.२०१६ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे कोणतीही माहिती दिलेली नसून अपिलार्थी त्यांच्या निर्णयापासून योग्य ते न्याय न मिळाल्याने नाराजीने दुसरे अपील मुदतीत सादर करीत आहे. "असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २९.१२.२०१५ रोजी प्रतिसाद देऊन पदनिर्देशित अधिकारी, अतिक्रमण विभाग, मनपा औरंगाबाद यांना अपिलार्थी यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासंदर्भात दिलेल्या पत्राची प्रत दिली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०.०३.२०१६ रोजी सुनावणी घेऊन "औरंगपूरा परिसरातील भाजी मार्केट येथील जागेवर बीओटी तत्त्वावर प्रस्तावित केलेल्या जागेची, तसेच प्रस्तावित बीओटी प्रकल्पालगत असलेल्या आपल्या मालकीहक्काच्या जागेचा, (नगरभूमापन क्रमांक ४५१७,४५१८ व ४५२२) तसेच प्रस्तावित बीओटी प्रकल्प व आपल्या उपरोक्त मालकी हक्काच्या जागेलगत पूर्वी

अस्तित्त्वातील असलेल्या रस्त्याचा (Lane) नगर भूमापन अधिकारी (DILR) यांच्यामार्फत प्रत्यक्ष मोजणी करून प्राप्त मोजणी नकाशा आधारे आपल्या प्रथम अपील प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल," असा निर्णय पारीत केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय आदेशात नमूद जागेची मोजणी अद्यापपावेतो झालेली नाही. सदर मोजणी नगर भूमापन कार्यालयाकडे प्रलंबित आहे. यासंदर्भात त्यांना चार स्मरणपत्रेही देण्यात आली आहेत. तथापि नगर भूमापन अधिकारी यांनी कोणताही अहवाल दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही. ही बाब विचारात घेता, नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांनी संदर्भित अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावा व तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अपिलार्थीस द्यावी, असे आयोगातर्फे निर्देशित करण्यात येऊन विचाराधीन अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रकरणात कलम ७(१) व १९(६) चा भंग दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनावरुन अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6521 दि. 26-12-15

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद शहर, औरंगाबाद

(३८)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

अपील क्र. ३२०५/२०१५

श्री. मधुकर रायाजी रगडे, : अपिलार्थी
रा. संजय नगर, गल्ली नं. ३,
घर नं. ५-९-१४०४, वॉर्ड क्रमांक-८४,
मुकुंदवाडी, औरंगाबाद-४३१००६

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा व्यवस्थापक,
महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या),
जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
खोकडपूरा, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय व्यवस्थापक,
महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या),
विभागीय कार्यालय, देवनागरी जबिंदा कॉर्नर,
शहानूर मिया दर्गा रोड,
औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०९.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २३.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी, यांचे प्रतिनिधी श्री. ए. बी. बळी व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. एस. एल. उईके, प्रादेशिक व्यवस्थापक, औरंगाबाद उपस्थित होते. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती यासंदर्भातील अहवाल, त्याचप्रमाणे द्वितीय अपील क्र. ३०४१/१३ संदर्भात आयोगाने दिलेल्या निर्देशासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी

यांनी आयोगासमोर सादर करण्याकरिता प्रकरणात आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. डी. डी. मोहिते, जिल्हा व्यवस्थापक व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. व्ही. एम. राठोड, सहायक लेखाधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि. ०८.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये एन.एस.के.एफ.डी.सी सफाई कामगार या योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये लाभ देण्यात आलेल्या लाभार्थींसंदर्भात दहा विविध मुद्यांद्वारे माहिती मागितलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.०८.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे मुद्दा क्र. १ ची माहिती अपिलार्थीस पाठविली आहे.

तदनंतर "अद्याप माहिती प्राप्त न झाल्याबाबत."असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०८.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०४.०८.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ ओरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अपूर्ण माहिती मिळाल्याने." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांना काही माहिती देण्यात आलेली आहे. काही माहिती दिलेली नाही. त्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. ०४.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला आहे. या निर्णयामध्ये, त्यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे दहा मुद्यांची माहिती मागविलेली आहे. नियमाप्रमाणे त्यांनी प्रत्येक मुद्दयाकरिता स्वतंत्र अर्ज करावयास पाहिजे होता, असे नमूद करून अपिलार्थीस मुद्दा क्र.१ ची माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०८.२०१५ रोजी मुद्दा क्र. १ संदर्भातील माहिती अपिलार्थीस दिली आहे.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या ९ वेगवेगळया अर्जासंदर्भात दिलेल्या प्रतिसादाचा तसेच अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील क्र. ३०४१/१३ संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगासमोर सादर केला. तथापि अपिलार्थी यांनी त्यांना अपूर्ण व चुकीची माहिती देण्यात आली आहे, अशी भूमिका घेतली आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेला प्रतिसाद यासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांची भूमिका मांडण्यासाठी संधी देण्यात येऊन प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अधिनियमातील कलम १९(८)(क) व १९(७) अन्वये अनिवार्य राहील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरीम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येइल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6515 दि. 26-12-15

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.

अपील क्र. १४३९/२०१५

श्री. दत्ता जेगा गेडाम,
मु. लीमगुडा, पो. पिंपळगाव (सी),
ता. किनवट, जि. नांदेड
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
संधि निकेतन संस्था, द्वारा संचलित
आदिवासी मुलीचे शैक्षणिक संकूल पिंपळगाव फाटा,
ता. किनवट, जि. नांदेड
: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण),
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट,
ता. किनवट, जि. नांदेड

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २३.०४.२०१५ रोजी राज्यमाहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि. २२.०९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. गुरुनुले जी. डी., शिक्षक उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली. त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्रीमती सविता उत्तम रुढे, मुख्याध्यापिका, संधि निकेतन संस्था, वडगाव द्वारा संचलित आदिवासी मुलींचे शैक्षणिक संकुल पिंपळगाव या उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.११.०७.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विद्यालयासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"संधी निकेतन वडगाव द्वारा संचलित आदिवासी मुलींचे शैक्षणिक संकुल पिंपळगाव फाटा ता. किनवट येथील सन २००३ पासून २०१४ पर्यंतच्या विद्यार्थ्यांची निर्गम उताराची छायांकित प्रत मिळणेबाबत "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. निरंक रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीसाठी शुल्क रु. २०००/- भरणा करण्याचे कळविले असल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ११.०९.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.११.२०१४ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " माहिती अधिकाराची दखल घेतली नाही, माहिती उपलब्ध करून दिली नाही,माहिती मिळण्यासाठी योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीसाठी"असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मोठया कालावधीची व सर्व विद्यार्थिनींची वैयक्तिक व गोपनीय माहिती मागितली आहे. सदर शाळा ही केवळ मुलींची शाळा आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देऊ नये.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र अ द्वारे सन २००३ ते २०१४ या कालावधीमधील जन माहिती अधिकारी यांच्या विद्यालयातील विद्यार्थिनींच्या निर्गम उताऱ्याची माहिती मागितली आहे. ही माहिती मागण्यामागे सार्वजनिक हीत काय आहे, अशी आयोगाने अपिलार्थीस पृच्छा केली असता, अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, या शाळेतील स्कॉलरशीप वाटपामध्ये गोंधळ असल्याचा त्यांना संशय आहे. तथापि त्यांनी ही माहिती न मागता विद्यार्थिनींच्या निर्गम उताऱ्याची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. या माहितीमधील सार्वजनिक हीत ते आयोगासमोर स्पष्ट करू शकले नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत तसेच मोघम असून विद्यार्थिनींसंदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची आहे. अशी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होणार नाही, ही बाब विचारात घेता, अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**आदेश**

वरील विवेचनावरुन अपील फेटाळण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

जावक क्र. 6469 दि. 23-12-15

(40)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१ ००१.
अपील क्र. २९०७/२०१५

श्री. गणेश एस. गंजरा, : अपिलार्थी
रा. घर क्रमांक ८३,
तोफखाना, छावणी औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी,
औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे दि.०८.११.२०१६ रोजी कळविण्यात आले.त्यानुसार आज दि. २१.११.२०१६ रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. एस. ढाकणे, अ.का उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५/०२/२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे धान्य व रॉकेलबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) छावणी परिसरात सरकारी रासन अन्न धान्यचे किती दुकान आहे. त्यांचे दुकान क्रमांक दुकान मालकांचे नाव.

२) जनवरी २०१४ ते फरवरी २०१५ पर्यंत आपल्या कार्यालयाकडून छावणी परिसरातील सरकारी रासन दुकानांना किती धान्य व कोणकोणते धान्य दर महिनेला वाटप करण्यात आले आहे.

३) जनवरी २०१४ ते फरवरी २०१५ पर्यंत छावणी परिसरातील सर्व सरकारी रासन दुकानदाराने कोण कोणते रासन कार्ड धारकांना धान्य दिले आहे, या रासन कार्ड धारकांचे नाव व सहि

४) प्राधान्य गटातील रासन कार्ड धारकांकडून एक हजार रुपये कसाचे घेतले रासन दुकानदारांनी

५) छावणी परिसरात किती रॉकेलचे परवाने आहे व कोणाच्या नावावर आहे. त्यांचे परवाना क्रमांक देणे व त्यांना आपल्या कार्यालयाकडून दि. ०१/१२/१४ ते २०/०२/२०१५ पर्यंत रॉकेलचा किती पुरवठा करण्यात आला आहे. दर महिन्याला हे सर्व परवाने धारकांनी कोणकोणते रासन कार्डधारकांना रॉकेल दिला आहे. त्या राशन कार्डधारकांचे नाव व सही ०१/१२/२०१४ ते २०/०२/२०१५ पर्यंत किती लिटर व काय भावने दिले रॉकेल.

६) छावणी परिसरातील कोणकोणते रासन कार्डांचा धान्य बंध करण्यात आला आहे. त्या रासन कार्डधारकांचे नाव व कसाला बंद करण्यात आला."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ३१.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित पाच स्वस्त धान्य दुकानदारांकडे अपिलार्थी यांचा माहितीच्या अर्जाची प्रत पाठवून अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी कळविल्याचे दिसून येत आहे.

तदनंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ३०.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलामध्ये " १) जबाब मिळाला नाही २) कोणतीच नोटस मला दिली नाही."असे प्रयोजन नमूद केलेले आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अर्जदार यांनी विविध ६ मुद्यांवर माहिती मागितली असून त्यांना अर्जामधील मुद्दा क्र. १ बाबत माहिती देण्यात आली असून शासन परिपत्रक २००९ नुसार प्रत्येक विषयाच्या मुद्याबाबत स्वतंत्र अर्ज कार्यालयास सादर केल्यास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या दस्ताऐवज व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र अ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाच स्वस्त धान्य दुकानदारांकडील माहिती विस्तृत स्वरुपात व विविध सहा मुद्यांद्वारे मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्र. १ ची माहिती दिलेली आहे. ही बाब अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ठरत आहे. प्रकरणात अधिनियमातील कलम ७(१) चा जाणीवपूर्वक भंग नाही. तथापि कलम १९(६) चा भंग स्पष्टपणे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजिबात सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 6478 दि. 23-12-15

(41)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २८९८/२०१५

श्री. रायभान किशन उघडे, : अपिलार्थी
रा. १४०, रामकृपा कॉलनी, म्हाडा,
दर्गा रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथ नगर(उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लाभक्षेत्र विकास भवन, गारखेडा परिसर, औरंगाबाद : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२१.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मौजे मुलानी वाडगाव व बाळापुर ता.पैठण येथील जायकवाडी जलाशयातील पाणी परवाना बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "अदयाप माहिती मिळाली नाही" असे कारण नमुद करुन अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १०.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि.२३.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मुळ अर्जातील मुद्या क्र.०१ ते ०६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे माहीती अप्राप्त" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे व्यक्तीश: माहिती मागितलेली आहे.

"१) मु.वाडगाव स.न.१२४ (१२४/१ ते १२४/८),स.न.१२५(१२५/१ ते १२५/९),स.न.१०३ (१०३/१ ते १०३/७), मु.बाळापुर येथील स.न.५/३ व ६/८ या संपुर्ण जमिनीचे पाणी परवाना प्रति देण्यात याव्यात.२) सदर जमिनीसाठी पाणी उपसा करणाऱ्या ई.मोटार पंप अश्वशक्ती (हार्सपॉवर) ची माहीती.३) पाणी परवान्यातील अट क्र.१३ नुसार बसविण्यात आलेल्या पाणीमापक यंत्राबाबत माहीती,यंत्र बसविण्यात आल्याचा दिनांक व चालु रिडींग.४) वरील सर्व जमिनीतील विहिरींची माहीती.५) आतापर्यंत भरण्यात आलेल्या पाणीपटटी (कर) वसुलीच्या पावत्या.६) जमिनीचे ७/१२ प्रति वरील पुर्वीपासुनची माहीती."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या अर्जानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणी दरम्यान अपीलार्थीस माहीती उपलब्ध करुन दिली असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढल्याचे दिसुन येत आहे.तथापी माहीती पुरविल्याची पोहच आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजामध्ये आढळुन येत नाही.त्यामुळे अपीलार्थीस

माहीती मिळाली किंवा कसे ? याबाबत खात्री करता आली नाही.प्रस्तुत प्रकरणामध्ये जन माहीती अधिकारी यांची कृती कलम ७(१) चा भंग करणारी असल्याने त्यांचा खुलासा आयोगास आवश्यक वाटतो.या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र. 6341 दि. 24/11/16

(अपील क्र.२८९८/२०१५)

(43)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९३२/२०१५

डॉ. प्रमोद एकनाथराव जाधव : अपिलार्थी
आर. एच-१, समर्थ हरिटेज, मराठवाडा सांस्कृतिक
मंडळासमोर, खडकेश्वर, औरंगाबाद-४३१००१

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद : उत्तरवादी

## (आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२९.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये पोलीस ठाणे, फुलंब्री गु.र.नं. ३१/२०१५ संदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती नाकारण्यात आली" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १०.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०७.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

"दि. १३.०८.२०१४ रोजीच्या पाझर तलाव, रेलगांव पाहणी व मोजमाप करतांना उपस्थित पंच व तांत्रिक समिती सदस्यांची नावे व पदनाम व पंचनामा"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल झाला असल्याचे अपिलार्थीने आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा पुरावा आयोगासमोर नाही. तथापी, प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. ०७.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपीलीय निर्णयाचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे दिसुन येत आहे. आज जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्याने त्याची शहानिशा आयोगास करता आली नाही. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्ज (जोडपत्र "अ") मध्ये नमुद माहिती पुन:श्च नोंदणीकृत डाकेने वस्तुस्थितीसह आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग

जावक क्र. 6511 दि. 26-12-16

(अपील क्र.२९३२/२०१५)

(४४)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९२२/२०१५

श्री. बाबासाहेब बापुराव लहाने, : अपिलार्थी
मु. सुंदरनगर, एस.टी. वर्कशॉपच्यामागे,
निळया झेंडयाच्याजवळ, औरंगाबाद रोड, जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, स्टेशन रोड, औरंगाबाद. : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्टेशन रोड, औरंगाबाद : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ११.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी श्री. एस. एन. नकाते हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये प्रियंका मोटर्स, जालना यांच्यासंदर्भात माहिती मागितलेली आहे.

यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०५.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती चुकीची दिल्यामुळे समाधान झाले नाही." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १५.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०४.०६.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती टपालाद्वारे मागितलेली आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

"१) प्रियंका मोटर्स, जालना यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथे दि. ०१.११.२०१४ ते ३१.०१.२०१५ या कालावधीत नवीन नोंदणी केलेले मोटार सायकलवर एकरकमी कर आकारणी (OTT) केलेले बिल (Tax Invoice) आणि एकरकमी कर भरणा केलेल्या पावत्या यांची झेरॉक्स प्रत देणे. २) सोबत जोडलेल्या प्रियंका मोटर्स, जालना यांच्या एकरकमी आकारणी बिलनुसार कंपनी किंमत ३९,४७०.९८ + व्हॅट ५४०९.८९ = ४४,८८०.८७ आणि शोरुम किंमत ४३,२७९.११ + व्हॅट ५४०९.८९ = ४८,६८९.०० यापैकी कोणत्या किंमतीवर एकरकमी कर भरणे अपेक्षित आहे. "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०५.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला असुन त्यामध्ये आवश्यक ते शुल्क भरण्यास कळविलेले आहे. प्रथम अपीलीय सुनावणी आदेशामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"अपिलार्थी यांनी वाहनांचे पर्टिक्युलर नको असुन फक्त सदर वाहनांचे नोंदणीवेळी दाखल केलेल्या टॅक्स इनव्हॉईस व त्यानुसार भरलेल्या कराच्या पावतीच्या प्रती हव्या आहेत. दि. ०१.११.२०१४ ते ३१.०१.२०१५ या कालावधीत २१२ वाहने नोंदणी झालेली असली तरी त्यांना नमुना म्हणुन ०५ Passion-Pro वाहनांचे टॅक्स इनव्हॉइस व कर भरणा पावत्या,

कर प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात व त्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते शुल्क भरुन घ्यावे. "

सदर आदेशाच्या प्रतीवर दि. १९.०६.२०१५ रोजी ५ गाडयांच्या टॅक्स इनव्हाईस मिळाल्या व टॅक्स पावत्या बाकी आहे अशी अपिलार्थीची पोहच दिसुन येते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी आयोग सहमत असुन आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सदर माहितीमध्ये टॅक्स पावत्या आहे किंवा कसे ? याची अपिलार्थी यांनी खातरजमा करावी अन्यथा जन माहिती अधिकारी यांच्याकडुन सशुल्क माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे असे आयोगाचे निरिक्षण आहे. या निष्कर्षासह सदर अपील निकाली काढण्यास योग्य असल्याने आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. वरील विवेचनामध्ये नमुद केल्यानुसार अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडुन सशुल्क माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र. 6495 दि. 23-12-16

(अपील क्र.२९२२/२०१५)

(45)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९४३/२०१५

| | | |
|---|---|---|
| | श्री. देविदास रखमाजी तरवडे, सजाई निवास, सदगुरु नगर, जुना औसा रोड, लातुर | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद | : उत्तरवादी |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : उत्तरवादी |

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. दिपक जयवळ, लेखाधिकारी व आर. के. चंदेल, परिविक्षा अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०५.०१.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये श्री. तरवडे डी. आर. यांचे भविष्य निर्वाह निधीमध्ये सन २००० मध्ये भरलेले रु. २६२०/- बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती एक महिन्याच्या आत न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०९.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २७.०५.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांचे माहिती देण्याबाबत आदेश देऊनही अद्याप माहिती दिली नसल्याकारणाने" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"श्री. तरवडे यांचे खाते क्रमांक एम.एस.बी.एन. ३४७४ मध्ये एप्रिल २००० मध्ये भरण्यात आलेली वसुली रु. २६२०/- चा तपशील आवश्यक आहे."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती देण्यात यावी या आदेशासह प्रथम अपील निकाली काढले आहे. त्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे संबंधीताची कृती कलम ७ (१) चा भंग करणारी आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक:२१.११.२०१६

---

जावक क्र. 65124 दि. 26-12-16

(अपील क्र.२९४३/२०१५)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३११३/२०१५

श्री. परमेश्वर दामु काकडे, : अपिलार्थी
प्लॉट नं. ३४, सुजाता कॉलनी, सौभाग्य चौक,
जळगांव रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, निपाणी, ता. जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ३१.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्रीमती शितल त्र्यंबकराव उमप व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. एस. पी. साळुंके हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०९.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मु. निपाणी पो. भालगांव, ता. जि. औरंगाबाद येथील प्लॉट नं. २५५

बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०७.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती देत नाही." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १२.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०८.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती देण्यास नकार" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"मु. निपाणी, पो. भालगांव, ता. जि. औरंगाबाद येथील १) प्लॉट नं. २५५ सदरील हा प्लॉट कोणाच्या नावाने आहे? त्याची लेखी स्वरुपात, त्यांचे संपुर्ण नांव, व पत्ता सहित. २) तत्पुर्वी सदरील प्लॉट हा कोणाचे नावे होता? त्याची लेखी स्वरुपात माहिती देणे. ३) सदरील प्लॉटचे हस्तांतरण झाले असल्यास ते कशाच्या आधारे झाले आहे? कोणाच्या नावे हस्तांतर झाले आहे? त्याचे संपुर्ण नांव, पत्ता त्याचे लेखी स्वरुपात माहिती देणे व संबंधीत कागदपत्रे देणे. (सन २००० ते आजपर्यंत)"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. यथावकाशाने दि. १२.०८.२०१५ रोजी कलम १९ (१) खाली अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. सदर सुनावणीमध्ये अपिलार्थीला माहिती देण्यात आलेली असल्याने प्रथम अपील निकाली काढलेले आहे. त्यानंतर अपिलार्थीने द्वितीय अपीलामध्ये "माहिती देण्यास नकार" असे प्रयोजन दिले आहे. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असेही स्पष्ट केले आहे की, सदरील प्लॉट यापुर्वी कोणाचे नावे होता? ही माहिती अद्याप मला मिळालेली नाही. म्हणजेच मुद्दा क्रमांक २ ची माहिती अपिलार्थीस दिली नाही असे आयोगाचे निदर्शनास आले. ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

याठिकाणी कलम ७ (१) व १९ (६) चा जाणीवपुर्वक भंग आढळुन येत नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती अभिलेख तपासुन आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

जावक क्र. 6512 दि. 26-12-16

(अपील क्र.३११३/२०१५)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३१९०/२०१५

श्री. रविंद्र शिवाजी गावंडे, : अपिलार्थी
मु. मांगेगांव, पो. तळपिंप्री, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद विभागीय क्रिडा संकुल, इनडोअर हॉल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, औरंगाबाद-४३१००५, : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ०७.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीचा खुलासा संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी आयोगास सत्वर पाठवावा.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१७.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये गंगापुर तालुक्यातील क्रिडा मंडळास सन २०११ ते २०१४ पर्यंत अनुदान वाटप संदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी वारंवार चकरा मारली असता माहिती अधिकारी जागेवर नाहीत व माहिती तयार नाही असे उडवाउडवीचे उत्तर दिल्याबद्दल" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २२.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती न दिल्याने" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती टपालाने मागितलेली आहे.

"१) गंगापुर तालुक्यातील क्रिडा मंडळाचे नांव २) संबंधीत क्रिडा मंडळास किती निधी प्राप्त झाला व दिला गेला त्याची माहिती ३) संबंधीत क्रिडा मंडाळाच्या कार्यालय व बिले (क्रिडा साहित्य) खरेदीची शहानिशा करुन अनुदान दिले काय? असल्यास त्या त्या बिलाच्या झेरॉक्स प्रतीची माहिती"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती

मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र. 6343 दि. 24/11/16 (अपील क्र.३१९०/२०१५)

प्रत:

संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, सोमवार पेठ, पुणे-४११००१ यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०८५/२०१५

डॉ. सैफुद्दीन अहेमद, : अपिलार्थी
रा. रहिम मार्केट, बसमस्टँड, अकोला-४४४००१

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी प्रोफेशनल युनिट, : उत्तरवादी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, : उत्तरवादी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी आयोगास पाठवावा अशी शिफारस कलम १९ (८) (क) अन्वये करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२९.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये Education matter from dt. २०.०४.२००२ ते २०.०५.२००८ माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "Information not supplied" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०२.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "Appeal not heard by the First Appellate Authority" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"१) Information about the studentship of Jayprakash Mahabirlal Jaiswal who passed M.D. (Homeopathic Materia Medica) from Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University-४३१००४ through D.K.M.M. Homeopathic Medical College and Hospital, Aurangabad as a regular student/collegiate or as a external / private candidate with duration of studentship. Eligibility Certificate Number of Jayprakash Mahabirlal Jaiswal is १२ (Sr. no. १२ on form - B) in the academic year २००३-२००४."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न

केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का

करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र. 6342 दि. 24/11/16 (अपील क्र.३०८५/२०१५)

प्रत:

कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२६२/२०१५

श्री. बाबासाहेब गोपीनाथ मैराळ, : अपिलार्थी
रा. भेंडाळा,ता.गंगापुर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तहसील कार्यालय, : उत्तरवादी
गंगापुर,जि.औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,गंगापुर : उत्तरवादी
जि.औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतचा खुलासा उप विभागीय अधिकारी,वैजापुर,जि.औरंगाबाद यांनी आयोगास सत्वर करावा.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.११.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सर्वे नं. १७४ बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती अद्याप पर्यंत मिळालेली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १५.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहीती न मिळाल्याबाबत" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती टपालाने मागितलेली आहे.

"सर्वे नं. १७४ मुळ जमीन १२.३५ गुंठे आहे तर गट नं. २३७ १४.३५ गुंठे वाढली कशी? जुना ७/१२ १२.३५ जमीन आहे व खासरा पत्रकावर १२.३५ गुंठे आहे. तर ही जमीन वाढली कशी ही माहिती मिळाण्याबाबत नम्र विनंती"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अशाच समान प्रकरणामध्ये राज्य माहीती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोरील द्वितीय अपील क्र.२८६८/२०१५ मध्ये दि.२३.०९.२०१६ रोजी निर्णय पारीत केलेला असल्याने प्रस्तुत अपील निकाली काढण्यास पात्र ठरते.सबब,आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

सदर अपील, अपील क्र. २८६८/२०१५ मधील निर्णय कायम ठेवुन या ठिकाणी निकाली काढण्यात येते.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र.--6360---- दि.-24-11-16-

(अपील क्र.३२६२/२०१५)

प्रत:-

उप विभागीय अधिकारी,वैजापुर,जि.औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक कार्यवाहीसाठी.

(51)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२२०/२०१५

श्री. विलास जगदेवराव गवई, : अपिलार्थी
मु. गट नं. ७२/२, घर नं. ९A, पार्ट, (A),
एकनाथ नगर, वंजारवाडी रोड, शरणापुर,
पो. पडेगाव, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, शरणापुर, ता. जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्रीमती सत्यगंगा बालाजी जकवाड व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. एस. पी. साळुंके हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२९.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये गट नं. ७२/२ शरणापुर येथील मंजुर लेआऊट प्रमाणे प्लॉट क्र. १८A, ५२/३० यावरील ३ मजली बांधकाम परमिशन (२००९ ते २०१५ पर्यंत) बाबत माहिती

मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.०६.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०८.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि. २७.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या प्रयोजनात "आठ दिवसाचे आत माहिती देण्याचे आदेश जाक्र.१६५३, १६५४ दि. २७.०७.२०१५ तरीही माहिती देण्यात आली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"वरील प्रमाणे व पार्ट A मधील ओपन प्लेस ११८० स्क्वे. फुट वरील गाळे बांधकाम परमिशन तसेच गट क्र. ७२/१ वरील वारे पाटील यांचे अपार्टमेंट बांधकाम परमिशन"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांना दि. २६.०६.२०१५ रोजी माहिती दिल्याबाबत युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केला. त्यापृष्ठयर्थ दस्तऐवज त्यांनी आयोगास सुनावणी दरम्यान दर्शविले. सदर दस्तऐवज पडताळुन पाहिले असता, ते प्रथम दर्शनी योग्य दिसुन येते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या जोडपत्र "क" मध्ये तथ्यांश दिसुन येत नाही. परीणाम स्वरुप सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.------------ 6349 दि.-------------- 24/11/15

(अपील क्र.३२२०/२०१५)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२२३/२०१५

श्री. विलास जगदेवराव गवई, : अपिलार्थी
मु. गट नं. ७२/२, घर नं. ९A, पार्ट, (A),
एकनाथ नगर, वंजारवाडी रोड, शरणापुर,
पो. पडेगाव, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, शरणापुर, ता. जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्रीमती सत्यगंगा बालाजी जकवाड व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. एस. पी. साळुंके हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१०.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मौजे शरणापुर गट नं. ७२/२ मधील बांधकामाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.०६.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती अधिकारातील माहिती दिली गेली नाही." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १६.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि. २७.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "आठ दिवसाचे आत माहिती देण्याचे आदेश जाक्र.१६५६, १६५७ दि. २७.०७.२०१५ तरीही माहिती देण्यात आली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"मौजे शरणापुर गट नं. ७२/२ मध्ये मच्छिंद्र एकनाथ वारे (प्रिती कंन्स्ट्रक्शन) एकुण प्लॉट व त्यांचा पी.टी.आर. हया बांधकाम परवान्याच्या सत्यप्रती. दिनांकीत मासिक ठरावाच्या सत्यप्रती"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांना दि. २६.०६.२०१५ रोजी माहिती दिल्याबाबत युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केला. त्यापृष्ठयर्थ दस्तऐवज त्यांनी आयोगास सुनावणी दरम्यान दर्शविले. सदर दस्तऐवज पडताळुन पाहिले असता, ते प्रथम दर्शनी योग्य दिसुन येते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या जोडपत्र "क" मध्ये तथ्यांश दिसुन येत नाही. परीणाम स्वरुप सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

(राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद)

दिनांक:२१.११.२०१६

---

जावक क्र. 6483 दि. 23-12-16

(अपील क्र.३२२३/२०१५)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९३१/२०१५

श्री. संजीव आसाराम सुलाने, : अपिलार्थी
मु. पो. डोणगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, डोणगांव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, गंगापुर, जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी आयोगास पाठवावा अशी शिफारस कलम १९ (८) (क) अन्वये करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२०.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत, डोणगांवचे बँक खात्याची माहिती (माहे एप्रिल- २०१०

ते मार्च-२०१५) बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती न मिळाल्यामुळे अपील दाखल" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २७.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती न मिळाल्यामुळे अपील दाखल" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"ग्रामपंचायत, डोणगांव, ता. गंगापुरचे बँक खाते असलेल्या सर्व बँकांचे नांवे व खात्याचा क्रमांक व त्या खात्याच्या वरील कालावधीचा खाते उताऱ्याच्या प्रमाणित प्रती मिळाव्या."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे

आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6545 दि. 25/11/16

(अपील क्र.२९३१/२०१५)

प्रत:

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

**अपील क्र. ३२९६/२०१५**

श्री. प्रभाकर सांडु पारधे, : अपिलार्थी
मु. पो. हट्टी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद-४३१११२

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, हट्टी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, सिल्लोड, जि. औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. व्ही. टी. गायकवाड व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. पी. बी. दौड हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०९.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन ०१ एप्रिल २०१४ ते मे अखेर २०१५ पर्यंत ग्रा. पं. अंतर्गत जमा

खर्च अनुदानबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्‌नंतर "संबंधीत माहिती वेळेच्या मुदतीच्या आत न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १५.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १०.०८.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊन सुध्दा माहिती दिली नसल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"साप्ताहिक जमा खर्चाची विवरणपत्र, ऑनलाईन दाखल केलेले तपशील, ग्रामपंचायतीला मिळाले अनुदान त्याचे इस्टिमेटची प्रत, प्रशासकिय मान्यता काम पुर्ण झाल्यास त्याबाबतची एम.बी. ची प्रत, वापरलेल्या मटरेल पावती, जसे खडी, सिमेंट, रेती त्याची रॉयल्टीची पावती, अदा केलेल्या धनादेशाच्या प्रती, जेथे कामे केले त्याठिकाणाबाबतचा ठराव किंवा करत असलेल्या कामाबाबतचा ठिकाण (जागेबाबत)वरीष्ठ अधिकारी यांचा अहवालाची प्रत, कामे ज्या ठेकेदाराकडून करून घेतली असतील किंवा करत असेल त्या ठिकाणाबाबत जाहिरात-जाहिर प्रगटन (टेंडर) च्या प्रती. कामे निवडीबाबत व जमा खर्चाबाबतचा ग्रामसभेच्या ठरावाच्या प्रती."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविल्याचे आयोगास सांगितले. तसेच माझा अपघात झाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला अशी कबुली त्यांनी दिली. तथापी, त्यापृष्ठयर्थ आवश्यक ते दस्ताऐवज आयोगासमोर सादर केले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या तोंडी युक्तीवादावर आयोग विश्वास ठेवु शकत नाही. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नसल्याने त्याबाबत शहानिशा करता आली नाही. प्रस्तुत प्रकरणी

आयोगासमोर आलेली वस्तुस्थिती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७ (१) भंग झाला असल्याचे आयोगाचे मत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी श्री. व्ही. टी. गायकवाड यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी जन माहीती अधिकारी श्री. व्ही. टी. गायकवाड यांचेवर सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग, औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र. 6510 दि. 26-12-16

(अपील क्र.३२९६/२०१५)

प्रत,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०९७/२०१५

श्री. आरेफ अली असिफ अली, : अपिलार्थी
खिडकीका बंगला,कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय, : उत्तरवादी
कन्नड, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, : उत्तरवादी
नगरपरिषद,कन्नड, जि. औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आयोगास पाठवावा अशी शिफारस कलम १९ (८) (क) अन्वये करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२३.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये दि.०५.०६.२०१५ रोजीचे बैठकीत मंजुर झालेल्या विकास कामाचे अंदाजपत्रकाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती वारंवार प्रत्यक्ष संपर्क करुनही दिली नाही.माहिती देण्यास टाळाटाळ" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २७.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "१) माहिती अधिकारी यांचेकडुन समक्ष संपर्क साधुनही मुदतीत माहिती दिली गेली नाही.२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"नगरपरिषदेच्या दि.०५.०६.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत कन्नड न.प.हददीत मंजुर झालेल्या विकास कामाचे नकाशासह अंदाजपत्रक व प्रस्ताव,अनुमोदकासह मंजुर ठरावाची साक्षांकित सत्यप्रत."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे

याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.------------ 6345 दि.-------------- 24/11/16 (अपील क्र.३०९७/२०१५)

प्रत:

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९२८/२०१५

श्री. अंबादास तुकाराम बावस्कर,
एकतानगर,जटवाडा रोड, औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय,
कन्नड, जि. औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद,कन्नड, जि. औरंगाबाद : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग
खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली,परंतु ते प्रत्यक्ष सुनावणीस उपस्थित नाहीत, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल आयोगास पाठवावा अशी शिफारस कलम १९ (८) (क) अन्वये जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१३.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानातील कामाबाबत (०१ एप्रिल, २००९

ते ३१ मार्च २०१५ पर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती मिळाली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २९.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "दि. २९.०५.२०१५ रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद, कन्नड यांच्याकडे प्रथम अपील केले असता माहिती दिली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"कन्नड, नगरपरिषद हद्दीमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील वरील कालावधीत फुलझाडावर व हिरवळीवर किती खर्च झाला व कोणत्या एजन्सीला काम देण्यात आले? उद्यानात जुनी झाडे किती होती? त्याची यादी व झाडे तोडली त्याची निविदेची छायाप्रत व उद्यानातील दिव्यावर किती खर्च झाले? त्याची माहिती"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी

जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 6345 दि. 25/11/16

(अपील क्र.२९२८/२०१५)

प्रत:

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०७१/२०१५

| | |
|---|---|
| श्री. दिलदार खाँन इलियास खाँन,<br>रजा पॅलेस, नुरानी कॉलनी, जामखेड,<br>जि. अहमदनगर-४१३२०१ | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक,<br>जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : उत्तरवादी |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक,<br>कृषी अधिकारी, औरंगाबाद | : उत्तरवादी |

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. पी. बी. अव्हाळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी. के. उगले हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये विकास कामाबाबत (०१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ पर्यंत)

माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती मिळण्याच्या मागणीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २६.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.१०.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मागणी केलेली माहिती आजपर्यंत मिळाली नाही आजपर्यंत अपील सुनावणीबाबत काहीही एक कळविलेले नाही व अपील सुनावणी घेतली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"जिल्हा औरंगाबाद अंतर्गत सर्व तालुका शेती शाळेची पुर्ण अहवाल आलेले अनुदान व अनुदान खर्च कसा झाला? त्याच्या (देयक) बिलांचे सर्व तालुकानिहाय माहिती सी.डी. मध्ये मिळावी."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी हे आज सुनावणीस हजर नाही. अपिलार्थी यांनी औरंगाबाद जिल्हयातील सर्व तालुका शेती शाळेची माहिती, खर्च व अनुदानाविषयी माहिती सी.डी. मध्ये मागितलेली आहे. तालुका स्तरावर जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे ९ जन माहिती अधिकारी आहेत. जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाने दि. २९.०४.२०१५ रोजी सर्व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचे जोडपत्र "अ" अग्रेषित केले आहे व त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थीस सोयगांव तालुका स्तरावरची माहिती दि. ०९.०७.२०१५ रोजी देण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले. प्रस्तुत प्रकरणामध्ये आयोगाचे निरिक्षण खालीलप्रमाणे आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

अपिलार्थीने तालुका स्तरावरची माहिति जिल्हा स्तरावर असलेल्या जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयांस मागितलेली आहे. जिल्हा स्तरावरील ही माहिती तालुका स्तरावरील कार्यालयाने संकलीत करुन देणे अपेक्षित नाही. यामध्ये जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे मनुष्यबळ व वेळ खर्च होत असल्याने जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाने वेळीच अपिलार्थीचा अर्ज एकाच तालुका कार्यालयाला अग्रेषित करुन अन्य कार्यालयाबाबत स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्याने वेगवेगळा माहितीचा अर्ज सादर करुन माहिती घ्यावी असा सल्ला अपिलार्थी यांना दिला असता तर सदर अपीलाचा वेळ वाचला असता. अपिलार्थी यांनी केवळ एका अर्जाद्वारे ९ सार्वजनिक प्राधिकरण यांना माहिती मागणे यथोचित नाही. त्यांची एका अर्जाद्वारे एका कार्यालयाची म्हणजेच सोयगांव तालुक्याची माहिति दिलेली असल्याने व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली असल्याने प्रस्तुत अपीलाची कायदेशीर पुर्तता झालेली दिसुन येते. अन्य कार्यालयाकडुन अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्जाद्वारे माहिती घेणे अपेक्षित आहे. ती कार्यवाही त्यांनी करावी. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विलंबाने सुनावणी घेतलेली असल्याने भविष्यात अशी पुनरावृत्ती करु नये अशी तंबी त्यांना देण्यात येत आहे. आज अपिलार्थी हजर नसल्याने त्यांची यासंबंधीची भुमिका कळु शकलेली नाही. या निष्कर्षासह सदर अपील निकाली काढण्याजोगे असल्याने आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.------------ दि.----------- (अपील क्र.३०७१/२०१५)

6482 23-12-16

(58)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०७२/२०१५

श्री. दिलदार खाँन इलियास खाँन, : अपिलार्थी
रजा पॅलेस, नुरानी कॉलनी, जामखेड,
जि. अहमदनगर-४१३२०१

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, : उत्तरवादी
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, : उत्तरवादी
कृषी अधिकारी, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. तायडे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी. के. उगले हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये कृषी अधिकारी व मंडल कृषी अधिकारी यांच्या दैनंदिनी व कामाचे तपासणी अहवालाबाबत (०१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ पर्यंत) माहिती मागितलेली आहे.

यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती मिळण्याच्या मागणीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २६.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.१०.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या प्रयोजनात "मागणी केलेली माहिती आजपर्यंत मिळाली नाही आजपर्यंत अपील सुनावणीबाबत काहीही एक कळविलेले नाही व अपील सुनावणी घेतली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"जिल्हा औरंगाबाद अंतर्गत मृद संधारण व जल संधारण यांच्या अंतर्गत सर्व योजनांचा सर्व तालुका कृषी अधिकारी व सर्व मंडल कृषी अधिकारी यांची सदर कामाच्या कालावधीमधील दैनंदिनी व कामाचे तपासणी अहवाल (प्रपत्र क ) यांची सर्व माहिती सी.डी. मध्ये मिळावी."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी हे आज सुनावणीस हजर नाही. अपिलार्थी यांनी औरंगाबाद जिल्हयातील सर्व तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी व मंडल कृषी अधिकारी यांच्या दैनंदिनी व कामाचे तपासणी अहवालाबाबत माहिती सी.डी. मध्ये मागितलेली आहे. तालुका स्तरावर जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे ९ जन माहिती अधिकारी आहेत. जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाने दि. २८.०४.२०१५ रोजी सर्व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचे जोडपत्र "अ" अग्रेषित केले आहे व त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थीस अद्यापपावेतो एकाही तालुका स्तरावरुन माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले. प्रस्तुत प्रकरणामध्ये आयोगाचे निरिक्षण खालीलप्रमाणे आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

अपिलार्थीने तालुका स्तरावरची माहिती जिल्हा स्तरावर असलेल्या जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयांस मागितलेली आहे. जिल्हा स्तरावरील ही माहिती तालुका स्तरावरील कार्यालयाने संकलीत करुन देणे अपेक्षित नाही. यामध्ये जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे मनुष्यबळ व वेळ खर्च होत असल्याने जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाने वेळीच अपिलार्थीचा अर्ज एकाच तालुका कार्यालयाला अग्रेषित करुन अन्य कार्यालयाबाबत स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्याने वेगवेगळा माहितीचा अर्ज सादर करुन माहिती घ्यावी असा सल्ला अपिलार्थी यांना दिला असता तर सदर अपीलाचा वेळ वाचला असता. अपिलार्थी यांनी केवळ एका अर्जाद्वारे ९ सार्वजनिक प्राधिकरण यांना माहिती मागणे यथोचित नाही. तथापी यापैकी एका सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करुन दिली असती तर प्रकरणात कायदेशीर पुर्तता पुर्ण झाली असती. त्यांनी तालुका स्तरावरील जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्र माहिती अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेणे अपेक्षित असुन ही बाब अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ती कार्यवाही अपिलार्थीने करावी. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या सुनावणी दरम्यान ही बाब अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते. त्यांनी अधिनियमातील तरतुद विचारात न घेता आदेश पारीत केल्याचे दिसते. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विलंबाने सुनावणी घेतलेली असल्याने ते कलम १९ (६) च्या भंगास पात्र ठरतात. आज अपिलार्थी हजर नसल्याने त्यांची यासंबंधीची भुमिका कळु शकलेली नाही. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**<u>आदेश</u>**

१. तालुका कृषी अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमुद प्रमाणे माहिती कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपिलार्थी यांनी औरंगाबाद जिल्हयातील उर्वरित तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्र माहिती अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात विहित मुदतीत सुनावणी न घेतल्याने कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र. 6480 दि. 23-12-15

(अपील क्र.३०७२/२०१५)

59

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०७३/२०१५

श्री. दिलदार खॉंन इलियास खॉंन, : अपिलार्थी
रजा पॅलेस, नुरानी कॉलनी, जामखेड,
जि. अहमदनगर-४१३२०१

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, : उत्तरवादी
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, : उत्तरवादी
कृषी अधिकारी, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. पी. बी. अव्हाळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी. के. उगले हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये विकास कामाबाबत (०१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ पर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती मिळण्याच्या मागणीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक

२६.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.१०.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मागणी केलेली माहिती आजपर्यंत मिळाली नाही आजपर्यंत अपील सुनावणीबाबत काहीही एक कळविलेले नाही व अपील सुनावणी घेतली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"जिल्हा औरंगाबाद अंतर्गत सर्व तालुका कोरडवाहु शेतीचे संपुर्ण कार्यक्रम प्रकल्प अहवाल आलेले अनुदान व खर्च झालेले अनुदान याची तालुकानिहाय सर्व माहिती सी.डी. मध्ये मिळावी."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी हे आज सुनावणीस हजर नाही. अपिलार्थी यांनी औरंगाबाद जिल्हयातील सर्व तालुक्यातील कोरडवाहु शेतीचे संपुर्ण कार्यक्रम प्रकल्प अहवाल, आलेले अनुदान व खर्च झालेले अनुदान यांची तालुकानिहाय माहिती सी.डी. मध्ये मागितलेली आहे. तालुका स्तरावर जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे ९ जन माहिती अधिकारी आहेत. जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाने दि. २९.०४.२०१५ रोजी सर्व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचे जोडपत्र "अ" अग्रेषित केले आहे व त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीस अद्यापपावेतो एकाही तालुका स्तरावरुन माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले. प्रस्तुत प्रकरणामध्ये आयोगाचे निरिक्षण खालीलप्रमाणे आहे.

अपिलार्थीने तालुका स्तरावरची माहिती जिल्हा स्तरावर असलेल्या जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयांस मागितलेली आहे. जिल्हा स्तरावरील ही माहिती तालुका स्तरावरील कार्यालयाने संकलीत करुन देणे अपेक्षित नाही. यामध्ये जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे मनुष्यबळ व वेळ खर्च होत असल्याने जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाने वेळीच अपिलार्थीचा अर्ज एकाच तालुका कार्यालयाला अग्रेषित करुन अन्य कार्यालयाबाबत स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्याने

वेगवेगळा माहितीचा अर्ज सादर करुन माहिती घ्यावी असा सल्ला अपिलार्थी यांना दिला असता तर सदर अपीलाचा वेळ वाचला असता. अपिलार्थी यांनी केवळ एका अर्जाद्वारे ९ सार्वजनिक प्राधिकरण यांना माहिती मागणे यथोचित नाही. तथापी यापैकी एका सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करुन दिली असती तर प्रकरणात कायदेशीर पुर्तता पुर्ण झाली असती. त्यांनी तालुका स्तरावरील जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्र माहिती अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेणे अपेक्षित असुन ही बाब अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ती कार्यवाही अपिलार्थीने करावी. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या सुनावणी दरम्यान ही बाब अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते. त्यांनी अधिनियमातील तरतुद विचारात न घेता आदेश पारीत केल्याचे दिसते. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विलंबाने सुनावणी घेतलेली असल्याने भविष्यात अशी पुनरावृत्ती करु नये अशी तंबी त्यांना देण्यात येत आहे. आज अपिलार्थी हजर नसल्याने त्यांची यासंबंधीची भुमिका कळु शकलेली नाही. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. तालुका कृषी अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमुद प्रमाणे माहिती शासन परिपत्रक दि. १९.१२.२०१५ मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच माहिती अधिकार अधिनियम - २००५ च्या कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपिलार्थी यांनी औरंगाबाद जिल्हयातील उर्वरित तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्र माहिती अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र. 6489 दि. 23-12-16

(अपील क्र.३०७३/२०१५)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२९३/२०१५

श्री. पांडुरंग बळीराम बारड, : अपिलार्थी
वसंतविहार, बिल्डिंग नं. ५, ब्लॉक नं. १०१,
गांधीनगर, डोंबिवली (पु.), ता. कल्याण, जि. ठाणे.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषी सह संचालक कार्यालय, अदालत रोड, औरंगाबाद. : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय अधिक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषी सह संचालक कार्यालय, अदालत रोड, औरंगाबाद. : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. डी. एम. घोगेवाड व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. टी. गायकवाड हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२७.११.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन १९६५-६६, १९६६-६७, १९६७-६८ चे गोपनीय अहवालाच्या

अभिप्रायाबाबत माहिती (फक्त माझ्या बाबत) मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०१.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १३.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावरील निर्णय दि. १६.०६.२०१५ अन्वये अपिलार्थीस कळविलेला दिसतो. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती शीघ्र टपालाने मागितलेली आहे.

"१) या कार्यालयीन पत्र क्रमांक विकृससं/आस्था/अ-२/केमाअ/८४९१ दि. २०.१०.२०१० अन्वये मुद्दा क्रमांक ३ सदरील माहिती ही गोपनीय असुन ती माहिती नियमानुसार उघड करता येत नाही. असे कळविले आहे. माझे एकटयाचे गो. अभिलेख्याच्या झेरॉक्स प्रतीच्या मागणी करीत आहे. ती कोणत्या शासकिय नियमाप्रमाणे माहितीच्या अधिकारात देता येत नाही याबाबत माहिती द्यावी. माझे गो. अ. माहिती दिल्यामुळे राष्ट्राचे नुकसान होणार नाही. २) अपील केआर क्र. ९१५/२०१० मधील तक्रार क्र. ३५४/२०१० संदर्भात दि. ११.१०.२०१० रोजी आयोगाच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही काय केली ? याची माहिती देणे."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या द्वितीय अपीलाचे अवलोकन केले असता, याच प्रकरणाशी साधर्म्य असलेल्या प्रकरणी द्वितीय अपील क्र. ८९५/२०१५ सुनावणी दि. २०.०१.२०१६ मध्ये या खंडपीठाने अपिलार्थी यांचे सेवाविषयक बाबीसंदर्भात काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. तथापी, त्यांच्या अशा तक्रारीसंदर्भात त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक होईल, असे निरिक्षण नोंदवुन अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात देखील अपिलार्थी यांची त्यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात तक्रार दिसून येते. अपिलार्थीची तक्रार ही ४० वर्षापुर्वीच्या अभिलेख्यासंदर्भात आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेला प्रतिसाद त्या-त्या परिस्थितीनुसार योग्य असल्याचे

आयोगास वाटते. त्यामुळे द्वितीय अपील क्र. ८९५/२०१५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींच्या तक्रारीसंदर्भात सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य राहील, या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.------------- दि.------------ (अपील क्र.३२९३/२०१५)
6517 26-12-16

61

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२००/२०१५

श्री. सय्यद आरीफ सय्यद असद, : अपिलार्थी
रा. अंभई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक, : उत्तरवादी
शासकिय वैद्यकिय रुग्णालय व महाविद्यालय (घाटी),
औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकिय अधिक्षक, : उत्तरवादी
शासकिय वैद्यकिय रुग्णालय व महाविद्यालय (घाटी),
औरंगाबाद

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वतीने ॲड. आर. एन. कुलकर्णी व ॲड. शेख उस्मान हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी डॉ. राजेश आंकुशे व प्रथम अपीलीय अधिकारी डॉ. सुहास जेवळीकर (तत्कालीन) व डॉ. एस. पी. चौधरी (विद्यमान) हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.११.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये एम.एल.सी. प्रकरणात वैद्यकिय प्रमाणपत्राबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०५.०६.२०१५ व ३०.०६.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "असमाधानकारक माहिती देऊन अर्जदार यांना कायदेशीर माहिती देण्यास असमर्थता दर्शविल्याने" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १०.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १०.०८.२०१५ निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मोघम स्वरुपात व अपुर्ण असामाधानकारक माहिती दिल्याने" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती शीघ्र टपालाने मागितलेली आहे.

"१) MLC No. १६००७/CKK/१४ दि. १०.०८.२०१४ वेळ १३.०५ वा. मधील जख्मी सय्यद जरीयाफ सय्यद मसुद, रा. अंभई २) MLC No. १६००८/VMR/१४ दि. १०.०८.२०१४ वेळ १३.१० वा. मधील जख्मी सय्यद रिहान सय्यद असद, रा. अंभई ३) MLC No. १६००९/VMR/१४ दि. १०.०८.२०१४ वेळ १३.२० वा. मधील जख्मी सय्यद आरेफ सय्यद असद, रा. अंभई ४) MLC No. १६०१०/PKK/१४ दि. १०.०८.२०१४ वेळ १३.२५ वा. मधील जख्मी इम्रान आरेफ सय्यद, रा. अंभई यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र मिळणे बाबत"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या अभियोक्त्याने आयोगास सांगितले की, सदर बाब ही न्याय वैद्यकिय प्रकरण असल्याने ४ ही जख्मींची वैद्यकिय प्रमाणपत्रे पोलीसांकडुन न्यायालयात येणे आवश्यक आहे. आयोगाने स्पष्ट केले की, अपिलार्थी यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र अपिलार्थीस देता येईल व इतर ३ जणांचे वैद्यकिय प्रमाणपत्र हे त्रयस्थ पक्षाचे असल्याने ते देता

येणार नाही. प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांची भुमिका अंशत: योग्य दिसुन येते. अपिलार्थी यांच्या अभियोक्त्यांना जर हे अन्य ३ जणांचे वैद्यकिय प्रमाणपत्र हवे असल्यास प्रत्येकांनी स्वतंत्र अर्ज करावा. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी हे अर्ज घेणे आवश्यक आहे. अभियोक्त्याने असेही सांगितले की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पोलीसांमार्फत सदर प्रमाणपत्र अजुनपर्यंत न्यायालयात दिलेले नाही, ते पुरवणी आरोपत्रामध्ये दाखल होणे आवश्यक आहे अन्यथा त्याचा परिणाम सदर प्रकरणावर होऊ शकतो. यावर जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की, पोलीसांना सदर प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यावर अभियोक्ता यांनी असे सांगितले की, पोलीसांना प्रमाणपत्र मिळाले नसल्याचे त्यांनी लेखी कळविलेले आहे. सारांशाने जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना सदर प्रमाणपत्र दिल्याची खात्री करावी व पोलीस निरिक्षक, अंजिठा पोलीस स्टेशन, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद यांनी सदर प्रमाणपत्र मिळाले असल्यास योग्य ती कार्यवाही वरीलप्रमाणे करावी असे त्यांना कलम १९ (८) (क) अन्वये कळविण्यात येत आहे. या निर्देशासह सदर अपील निकाली काढण्यास पात्र ठरते. याठिकाणी कलम ७ (१) व १९ (६) चा भंग झालेला दिसुन येत नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र आयोगाचे आदेश प्राप्त होताच विनामुल्य नोंदणीकृत टपालाने तात्काळ पाठविण्यात यावे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.-----6510------ दि.---26-11-16---- (अपील क्र.३२००/२०१५)

प्रत: उप विभागीय पोलीस अधिकारी, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांनी सदर आदेशाची प्रत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन अजिंठा, यांच्यावर तामील करावी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२६०/२०१५

श्री. फेरोजखाँन अय्युबखाँन पठाण, : अपिलार्थी
दर्गावेस, पोलीस स्टेशन रोड, वैजापुर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिक्षक, : उत्तरवादी
उप जिल्हा रुग्णालय वैजापुर, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक, : उत्तरवादी
सामान्य रुग्णालय, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी डॉ. डी. ए. कुलकर्णी व प्रथम अपीलीय अधिकारी डॉ. जी. एम. गायकवाड हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२८.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये हॉस्पीटलमध्ये असलेल्या जनरेटर बाबत (एप्रिल २०१० ते मार्च

२०१५ पर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "सदर माहिती अद्याप देण्यात आली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०६.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि. २८.०७.२०१५ सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अपुर्ण व चुकीची माहिती दिल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती टपालाने मागितलेली आहे.

"हॉस्पीटलमध्ये जनरेटर किती आहे? डिझेल व गॅसवर चालणाऱ्या जनरेटरची संपुर्ण माहिती देणे उदा. क्षमता, कंपनीचे नांव व कार्यान्वित केल्याचे दिनांक, लोडशेडिंग असल्यावर कोणते जनरेटर किती वेळ चालविले त्याचे लॉगबुक प्रमाणे मासिक गोषवारा देणे. जनरेटर वेळोवेळी कोणत्या उद्देशासाठी, कोणत्या वॉर्डासाठी किती वेळ व कोणाच्या आदेशानुसार वापरण्यात आले, लॉगबुक प्रमाणे दैनंदिन माहिती देणे. दिलेल्या कालावधीतील लॉगबुकची संपुर्ण माहिती छायांकित प्रतीती देणे. सर्विसिंग व इतर दुरुस्ती वर झालेल्या खर्चाची माहिती देणे. कार्यालयीन खर्चातुन झालेले खर्च व NRHM अंतर्गत डिझेल व गॅसवर झालेल्या खर्चाचा तपशील वेगवेगळया स्वरुपात देणे, जनरेटरचे ॲव्हरेज व त्यावर वापरलेले डिझेल व गॅस यांचे ताळमेळ असणारे दैनंदिन खर्चाचे तपशील देणे"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात मागितलेली माहिती ही अतिशय विस्तृत, फारशी सार्वजनिक हेतु नसलेली व प्रश्नार्थक स्वरुपाची दिसुन येते. तथापी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. २८.०७.२०१५ रोजी सदर माहिती संकलित करुन दिलेली असुन त्याची पोहच अभिलेखीत केलेली आहे. अपिलार्थी यांनी कलम १९ (१) खाली प्रथम

अपील दाखल केले. दि. २८.०७.२०१५ रोजी त्यावर सुनावणी होऊन प्रथम अपील आदेश निर्गमित झालेले दिसुन येते. त्यात अपिलार्थी यांना १५ दिवसांत माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या दिवशीच अपिलार्थी यांना माहिती दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. त्यानंतर कलम १९ (३) अन्वये दि. १४.०९.२०१५ रोजी दाखल द्वितीय अपीलाच्या प्रयोजनात "अपुर्ण व चुकीची माहिती दिल्यामुळे" असे नमुद केलेले आहे. आज अपिलार्थी हजर नाही त्यामुळे त्याची शहानिशा करता येऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती पुर्ण आहे व ती तपासली असता योग्य दिसुन येते. याठिकाणी कलम ७ (१) व १९ (६) चा जाणीवपुर्वक भंग आढळुन येत नाही. सारांशाने सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

---

जावक क्र. 6490 दि. 23-12-16

(अपील क्र.३२६०/२०१५)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २८९९/२०१५

श्री. रवि हरिभाऊ चव्हाण, : अपिलार्थी
रा. आसेगांव पेन, ता. रिसोड, जि. वाशिम

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप प्रबंधक(प्रशासन), : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्रशासन), : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**
**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. धोंगडे व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. एस. डी. धोंगडे हेच उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०१.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद रिट याचिका क्रमांक

४१६८/२०१२ सदर रिट याचिकाचे विषय संच झेरॉक्स मिळणे बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "मागितलेली माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०५.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.०६.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मागितलेली माहिती न्यायदान स्वरुपाची असुन अशाप्रकारची माहिती देता येत नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी वरील रिट याचिककावर दि. २४.१०.२०१३ ला कोर्ट आदेश पारीत केला त्याची झेरॉक्स मिळणे व सदरचे आदेश देण्यामागचे ठोस कारणे हिंदी किंवा मराठी भाषेत मिळणे"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयीन प्रकरणाची निकालाची प्रत www.bombayhighcourt.nic.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेता येतात किंवा मुंबई उच्च न्यायालय अपील शाखा नियम, १९६० मधील तरतुदींनुसार या कार्यालयाच्या नक्कल विभागाकडे प्रमाणित प्रत मिळण्यासाठीचा रितसर अर्ज करुन पाहिजे असलेल्या न्यायालयीन प्रकरणाची निकालाची प्रत प्राप्त करुन घेता येते असे कळविलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी रिट याचिकेवरील आदेश देण्यामागचे ठोस कारणे सुध्दा विचारली आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असेही स्पष्ट केले आहे की, अपिलार्थी यांनी एकप्रकारे न्यायदान प्रक्रियेतील, न्यायालयाचे कार्य याबाबतची माहिती मागितलेली आहे. अशी माहिती मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार सुधारित नियम, २००९ चे नियम १३ (ब) अन्वये देता येत नाही असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या आयोगासमोरील लेखी युक्तीवादामध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

"मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार सुधारित नियम, २००९ चे नियम १० (३) व १३ (ब) खालीलप्रमाणे आहे.

१० (३) जर अर्जदाराने मागणी केलेली माहिती न्यायप्रक्रियेतील किंवा अभिलेखातील असल्यास अर्जदाराने अशी माहिती प्रमाणित प्रती घेण्यासाठी त्यावेळी अंमलात असलेल्या नियम किंवा आदेशानुसार जी प्रक्रिया असेल त्या पध्दतीने घ्यावी.

१३ माहिती उघड करण्यापासुन सुट :-

कलम ८ मध्ये नमुद केलेली माहिती उघड करता येणार नाही तथा उपलब्ध करुन देता येणार नाही विशेष पुढील माहिती उघड करता येणार नाही.

(ब) न्यायालयीन कामकाज व न्यायालयाचे कार्य तथा त्यासंबंधीत असलेल्या प्रकरणाची माहिती"

प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची भुमिका योग्य असुन आयोग त्यांच्याशी सहमत असुन सदर अपील फेटाळण्या योग्य असल्याचे आयोगाचे निष्कर्ष आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील फेटाळयात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.-6352- दि.-25/11/16-

(अपील क्र.२८९९/२०१५)

64

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९९२/२०१५

श्री. माधवराव दिनकरराव सरगर, : अपिलार्थी
रा. मांडवा दु., पो. ऑ. झरी, ता. जि. परभणी-४३१५४०

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप प्रबंधक(प्रशासन), : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्रशासन), : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांचे दि. २२.०७.२०१५ चे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांचेकडुन राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दि. १९.०८.२०१५ रोजी प्राप्त झाले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. धोंगडे व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. एस. डी. धोंगडे हेच उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०३.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ०२/२०१५ तील अपील अर्ज / अर्ज प्रकरणी (फौजदारी परिपुर्ण प्रकरणी) उच्च न्यायालयीन कार्यवाही अहवाल प्रत मिळणे बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०३.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "परिपुर्ण प्रकरणी कायद्यान्वये प्रचंड दु:खी व असमाधान व अस्वस्थ असल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २२.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १६.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"१) ०२/२०१५ तील अपील अर्ज / अर्ज २) उच्च न्यायालयीन प्रकरणी परिपुर्ण कार्यवाही अहवाल व न्यायनिर्णय प्रत "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकारामध्ये मुद्या क्रमांक १ मध्ये जो अपील अर्ज/अर्ज मागितलेला आहे तो अर्ज विधी व सेवा उप समिती, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे वर्ग करण्यात आला असल्यामुळे त्यांच्याकडुन प्राप्त करुन घेऊ शकता असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसते. मुद्या क्रमांक २ संदर्भात अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले आहे. आयोगास जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची भुमिका योग्य वाटते. त्यामुळे प्रस्तुत अपील फेटाळण्याजोगे असल्याचे आयोगाचे निष्कर्ष आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र.--6350----- दि.--24/11/16-

(अपील क्र.२९९२/२०१५)

(65)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९९१/२०१५

श्री. माधवराव दिनकरराव सरगर, : अपिलार्थी
रा. मांडवा दु., पो. ऑ. झरी, ता. जि. परभणी-४३१५४०

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप प्रबंधक(प्रशासन), : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्रशासन), : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांचे दि. २२.०७.२०१५ चे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांचेकडुन राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दि. १९.०८.२०१५ रोजी प्राप्त झाले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. धोंगडे व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. एस. डी. धोंगडे हेच उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०३.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ०२/२०१५ तील अपील अर्ज / अर्ज प्रकरणी (फौजदारी परिपुर्ण प्रकरणी) उच्च न्यायालयीन कार्यवाही अहवाल प्रत मिळणे बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०३.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "परिपुर्ण प्रकरणी कायद्यान्वये प्रचंड दु:खी व असमाधान व अस्वस्थ असल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २२.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १६.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"१) ०२/२०१५ तील अपील अर्ज / अर्ज २) उच्च न्यायालयीन प्रकरणी परिपुर्ण कार्यवाही अहवाल व न्यायनिर्णय प्रत "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकारामध्ये मुद्या क्रमांक १ मध्ये जो अपील अर्ज/अर्ज मागितलेला आहे तो अर्ज विधी व सेवा उप समिती, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे वर्ग करण्यात आला असल्यामुळे त्यांच्याकडुन प्राप्त करुन घेऊ शकता असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसते. मुद्या क्रमांक २ संदर्भात अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले आहे. आयोगास जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची भुमिका योग्य वाटते. त्यामुळे प्रस्तुत अपील फेटाळण्याजोगे असल्याचे आयोगाचे निष्कर्ष आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील फेटाळण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.-----6351------- दि.-----26/11/15-----

(अपील क्र.२९९१/२०१५)

(67)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०९३/२०१५

प्राधिकृत स्वाक्षरीकार, औरंगाबाद टेक्सटाईल अँन्ड अपारेल पार्क लि., कोतवालपुरा, नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनचा उपक्रम, औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी-ड, महानगरपालिका, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीच्या वेळी औरंगाबाद टेक्सटाईल अँन्ड अपारेल पार्क लि., कोतवालपुरा, नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनचा उपक्रम, औरंगाबाद यांचे प्राधिकृत स्वाक्षरीकार श्री. जयकृष्ण ग्रोवर हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. आर. जरारे व प्रथम अपीलीय अधिकारी व्ही. एम. निकम हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१७.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मिलकॉर्नर ते अंजली टॉकीजपर्यंत घर क्रमांक व मालमत्ता क्रमांक तपशीलाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०५.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "संपुर्ण माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १४.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २८.०५.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अद्याप माहिती मिळाली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत डाकेने मागितलेली आहे.

"मिलकॉर्नर ते अंजली टॉकीजपर्यंत दक्षिणेस असलेल्या भोईवाडा एरियातील सर्व रहिवाशांचा महानगरपालिका घर क्रमांक, नांव व त्यांनी भरलेल्या मालमत्ता क्रमांक यादी देण्याची कृपा करावी."

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) नुसार दि. २७.०८.२०१५ रोजी प्राप्त द्वितीय अपील व त्यासोबतची सहपत्रे लक्षात घेता माहिती for Aurangabad Textiles and Apparel Parks Ltd. या नावाने मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार माहिती मागण्याचा अधिकार हा फक्त भारतीय नागरिकांनांच प्रदान करण्यात आला असुन संस्थेच्या नावाने माहिती अधिकारात माहिती मागणे अभिप्रेत नाही. सदर संस्थेला भारतीय नागरीकाचा दर्जा प्राप्त करुन दिलेला नाही. तसेच आयोगाच्या पटलावर असलेले जोडपत्र "अ", "ब" व "क" मध्ये सुध्दा त्यांनी आपले नांव उघड केलेले नाही. म्हणजे माहिती संस्था मागत असुन ती भारतीय नागरिक नाही. या प्रकरणात जन

माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडुन ही बाब दुर्लक्षित झालेली दिसुन येत आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ चे कलम ३ मधील खालील तरतुद पाहता सदर अपील आयोगासमोर चालविण्याची आवश्यकता नाही.

> "कलम ३:- या अधिनियमाच्या तरतुदींना अधिन राहुन, सर्व नागरीकांना माहितीचा अधिकार असेल."

सारांशाने प्रस्तुत अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील फेटाळण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.--6364-- दि.--30/11/16--

(अपील क्र.३०९३/२०१५)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०९४/२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

प्राधिकृत स्वाक्षरीकार, औरंगाबाद टेक्सटाईल अँन्ड अपारेल पार्क लि., कोतवालपुरा, नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनचा उपक्रम, औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी-ड, महानगरपालिका, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीच्या वेळी औरंगाबाद टेक्सटाईल अँन्ड अपारेल पार्क लि., कोतवालपुरा, नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनचा उपक्रम, औरंगाबाद यांचे प्राधिकृत स्वाक्षरीकार श्री. जयकृष्ण ग्रोवर हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. आर. जरारे व प्रथम अपीलीय अधिकारी व्ही. एम. निकम हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१७.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मिलकॉर्नर ते अंजली टॉकीजपर्यंत घर क्रमांक व मालमत्ता क्रमांक तपशीलाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०५.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "संपुर्ण माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १४.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २८.०५.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या प्रयोजनात "अद्याप माहिती मिळाली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत डाकेने मागितलेली आहे.

"भुमापन क्रमांक २७२४, २७२५, २७२५/१, २७२५/२, २७४० ते २७८० २७९० ते २८२१, २८८९ ते २८९१ व २८३३ ते २८३५ एकुणे ७९ भुमापन क्रमांकामध्ये राहत असलेल्या रहिवाशांना मालमत्ता कर लागु करण्यात आला आहे का? असल्यास त्याची नांवे, घरक्रमांक व मालमत्ता कर कुठपर्यंत भरलेला आहे त्याचा तपशील"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) नुसार दि. २७.०८.२०१५ रोजी प्राप्त व्दितीय अपील व त्यासोबतची सहपत्रे लक्षात घेता माहिती for Aurangabad Textiles and Apparel Parks Ltd. या नावाने मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार माहिती मागण्याचा अधिकार हा फक्त भारतीय नागरिकांनांच प्रदान करण्यात आला असुन संस्थेच्या नावाने माहिती अधिकारात माहिती मागणे अभिप्रेत नाही. सदर संस्थेला भारतीय नागरीकाचा दर्जा प्राप्त करुन दिलेला नाही. तसेच आयोगाच्या पटलावर असलेले जोडपत्र "अ", "ब" व "क" मध्ये सुध्दा त्यांनी आपले नांव उघड

केलेले नाही. म्हणजे माहिती संस्था मागत असुन ती भारतीय नागरिक नाही. या प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडुन ही बाब दुर्लक्षित झालेली दिसुन येत आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ चे कलम ३ मधील खालील तरतुद पाहता सदर अपील आयोगासमोर चालविण्याची आवश्यकता नाही.

> "कलम ३:- या अधिनियमाच्या तरतुदींना अधिन राहुन, सर्व नागरीकांना माहितीचा अधिकार असेल."

सारांशाने प्रस्तुत अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील फेटाळयात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.---6365--- दि.---30/11/16---

(अपील क्र.३०९४/२०१५)

(68)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१
अपील क्र. २९०८/२०१५

श्री. यशवंत पांडुरंगराव पवार, : अपिलार्थी
प्लॉट नं. २८, दिशा नभांगन, संत तुकाबानगर,
एन-२, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी सहसंचालक : उत्तरवादी
(उच्च शिक्षण) कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, : उत्तरवादी
(उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, देवगिरी
महाविद्यालयाजवळ, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

## (आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी डॉ. आर. एस. धामणसकर हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२७.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये इंद्रराज महाविद्यालय येथील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०६.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिली नाही." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २०.०६.२०१५ रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती अधिकाऱ्याने जाणीवपुर्वक माहिती दडवुन ठेवली व अपीली अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही " असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

"इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड येथील विज्ञान शाखेतील अनुदानित पदावर कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भात माहिती १) मा. सहसंचालकाचे भरती करण्यासाठीचे नाहरकत प्रमाणपत्राची प्रत. २) संबंधीत कर्मचाऱ्यांच्या भरतीसदंर्भात वृत्तपत्रातील देण्यात आलेली जाहिरातीची प्रत. ३) संबंधीत कर्मचाऱ्यांची मा. सहसंचालक कार्यालयाकडुन मिळालेल्या मान्यतेची प्रत"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, प्रस्तुत माहिती अर्जाप्रमाणे अपिलार्थी यांनी इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड यांना दि. २३.०२.२०१५ रोजी माहिती मागितलेली होती. सदर प्रकरणी द्वितीय अपील क्र. २३०५/२०१५ मध्ये आयोगाने निर्णय दिलेला आहे. दोन्ही माहिती अर्जातील विषय एकच असल्याने सदर अपील निकाली काढण्यास पात्र असल्याचे आयोगाचे निष्कर्ष आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील क्र. २३०५/२०१५ मधील निर्णय कायम ठेऊन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

राज्य माहिती आयोग

जावक क्र. 6479 दि. 23-12-16

(अपील क्र.२९०८/२०१५)

(६९)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९१४/२०१५

ॲड. रमेश कि. भालेराव, : अपिलार्थी
सिडको, एन-९, म्हाडा कॉलनी, रायगड नगर,
फ्लॅट क्र. आर-२६/एम-१३/५१, औरंगाबाद-४३१००३

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), : उत्तरवादी
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), : उत्तरवादी
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ११.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतची चौकशी करुन त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी आयोगास तात्काळ कळवावा तसेच आवश्यकतेनुसार संबंधीताविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाईचा निर्णय घ्यावा असे त्यांना कलम १९ (८) (क) अन्वये कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०२.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये डॉ. वाय. एस. इंटरनॅशनल स्कुल, औरंगाबाद या शाळेच्या मान्यतेसंदर्भात (सन २०११ ते आजपर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मुदतीत काहीही कळविलेले नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २०.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "३० दिवसाचा विहित कालावधी उलटुन गेला तरी जन माहिती अधिकारी यांनी काहीही केले नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारीप यांनी माझे प्रथम अपीलावर निर्णय घेऊन मला काहीही कळविलेले नाही." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"१) डॉ. वाय. एस. इंटरनॅशनल स्कुल, एन-६, सिडको, औरंगाबाद या शाळेने मान्यता मिळविण्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम-२०११ च्या नियम ११ (१) अन्वये विहित केलेल्या नमुना नं. १ मध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची व प्रपत्रातील अर्जाची प्रमाणित प्रत २) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी उपरोक्त नियम २०११ च्या नियम ११ (४) अन्वये विहित केलेल्या नमुना नं. २ मध्ये सदर शाळेस देण्यात आलेल्या मान्यता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत कृपया द्यावी. सदर शाळेस अद्याप पर्यंत मान्यता प्रमाणपत्र दिले नसल्यास त्याबाबत नमुद केलेल्या लेखी कारणांची कृपया प्रमाणित प्रत द्यावी"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, मला जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०५.२०१५ च्या पत्रान्वये त्यांचा माहिती अर्ज संबंधीत शाळेकडे वर्ग केल्याचे आयोगाच्या पटलावरुन दस्तऐवजावरुन दिसुन येत आहे. याबाबत अपिलार्थी यांना विचारणा केली असता त्यांनी सदर अर्ज नियमबाहयरित्या वर्ग केला असुन वास्तविक पाहता माझ्या माहिती अर्जामध्ये नमुद केल्यानुसार मी संबंधीत शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या व शिक्षणाधिकारी यांनी मान्यता दिलेल्या प्रस्तावाच्या प्रती मागितलेल्या असुन त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अनिवार्य आहे असे आयोगास सांगितले. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपुर्वक जबाबदारी टाळली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. ०८.०५.२०१५ रोजीचे पत्र बाजुला सारणे क्रमप्राप्त ठरते.

प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त प्रथम अपीलावर सुनावणी घेतल्याचे आढळुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. अपिलार्थी यांनी त्यांनी मागणी केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलावर दि. ०९.०६.२०१५ व दि. २७.०७.२०१५ च्या पत्रानुसार पाठपुरावा करुनही माझे अपील निकाली काढले नाही. यास्तव मला फारच मन:स्ताप भोगावा लागल्याने अधिनियमातील कलम १९ (८) (ख) अन्वये नुकसान

भरपाई अदा करावी अशी आयोगास विनंती केली. यासंदर्भात संबंधीतांचा खुलासा घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीस वारंवार खेटया घालाव्या लागल्याने त्याचा त्यांना शारीरिक/मानसिक त्रास झाला म्हणुन ते नुकसान भरपाईस पात्र ठरतात. त्यामुळे कलम १९ (८) (ख) अन्वये त्यांना रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) नुकसान भरपाई का मान्य करण्यात येऊ नये? याचा खुलासा संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक:२१.११.२०१६

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.------------ 6492 दि.------------ 23-12-16

(अपील क्र.२९१४/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार तात्काळ आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(70)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९६२/२०१५

ॲड. रमेश कि. भालेराव,
सिडको, एन-९, म्हाडा कॉलनी, रायगड नगर,
फ्लॅट क्र. आर-२६/एम-१३/५१, औरंगाबाद-४३१००३ : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण सहायक संचालक,
विभागीय शिक्षण उप संचालक यांचे कार्यालय,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१००१ : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उप,
संचालक, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१००१ : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १४.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतची चौकशी करुन त्याचा अहवाल शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आयोगास तात्काळ कळवावा तसेच आवश्यकतेनुसार संबंधीताविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाईचा निर्णय घ्यावा असे त्यांना कलम १९ (८) (क) अन्वये कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०२.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये डॉ. वाय. एस. इंटरनॅशनल स्कुल, औरंगाबाद या शाळेच्या

मान्यतेसंदर्भात (सन २०१० ते आजपर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मुदतीत काहीही कळविलेले नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २१.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत मला काहीही कळविलेले नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत मला निर्णय कळविलेला नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"१) कॅपीटेशन फी ॲक्ट-१९८७ मधील कलम ४ (३) अन्वये दि. १५.०७.२०१० च्या शासन निर्णयानुसार विभागीय शिक्षण उप संचालक, औरंगाबाद यांनी सन २०१० ते २०१४ या कालावधीत डॉ. वाय. एस. इंटरनॅशनल स्कुल, सिडको, एन-६, औरंगाबाद यांनी प्राथमिक शाळेमधील शिकवणी शुल्क व प्रतिभुती म्हणुन अनामत शुल्क यांना ज्या आदेशान्वये / पत्रान्वये मान्यता दिली आहे त्या सर्व आदेशांची / पत्रांची प्रमाणित प्रत २) प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेनंतर पालकांनी शिकवणी शुल्क (Tution Fee) भरल्यास प्रतिदिन रु. १५ या दराने आकारणी करुन संबंधीत पालकांकडुन सदर शाळा दंड वसुल करते. तरी या दंड वसुलीस शिक्षण उप संचालक, औरंगाबाद यांनी ज्या आदेशान्वये / पत्रान्वये मान्यता दिली आहे त्या सर्व आदेशांची / पत्रांची प्रमाणित प्रत."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, मला जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले. तथापी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर म्हणजेच दि. २१.०४.२०१५ नंतर दि. २८.०८.२०१५ च्या पत्रान्वये माहिती अर्ज प्राप्त झाल्यापासुन

तब्बल ०६ महिन्यानंतर अतिशय मोघम स्वरुपात अपिलार्थीस प्रतिसाद दिल्याचे आयोगाच्या पटलावरुन व दस्तऐवजावरुन दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपुर्वक जबाबदारी टाळली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. २८.०८.२०१५ रोजीचे पत्र बाजुला सारणे आयोगास आवश्यक वाटते.

प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त प्रथम अपीलावर सुनावणी घेतल्याचे आढळुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भातील उदासिनता स्पष्ट होते. सबब, संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. अपिलार्थी यांनी त्यांनी मागणी केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलावर दि. २७.०७.२०१५ च्या पत्रानुसार पाठपुरावा करुनही माझे अपील निकाली काढले नाही. यास्तव मला फारच मन:स्ताप भोगावा लागल्याने अधिनियमातील कलम १९ (८) (ख) अन्वये नुकसान भरपाई अदा करावी अशी आयोगास विनंती केली. यासंदर्भात संबंधीतांचा खुलासा घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीस वारंवार खेटया घालाव्या लागल्याने त्यांना शारीरिक/मानसिक त्रास झाला म्हणुन ते नुकसान भरपाईस पात्र ठरतात. त्यामुळे कलम १९ (८) (ख) अन्वये त्यांना रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) नुकसान भरपाई का मान्य करण्यात येऊ नये? याचा खुलासा संबंधीतांनी करावा.

६. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र. 6697 दि. 23-12-16

(अपील क्र.२९६२/२०१५)

प्रत,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निकालपत्रातील नोंदीनुसार तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(71)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३१४६/२०१५

श्री. आसाराम आनंदराव मेहेत्रे, : अपिलार्थी
रा. जिजामाता शिक्षण संस्था, सिंदखेड राजा,
जि. बुलढाणा.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, : उत्तरवादी
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, : उत्तरवादी
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०३.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तसेच जन माहिती अधिकारी श्री. व्ही. आर. आहेर व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. सी. खोमणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२९.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन १९८४-८५ मधील डी.एच.ई. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.०८.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती देण्यास विलंब व टाळाटाळ, व्यक्तिश: येऊन माहिती न देणे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०८.०९.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०७.१०.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

"१) १९८४-८५ मधील डी.एच.ई. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची महावार (महिनेवार) उपस्थिती पट यादीसह सत्यप्रत मिळणे बाबत २) त्यावेळचे कॉलेजचे वेळापत्रक"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ अंतर्गत माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे देता येत नसल्याचे अपिलार्थीस दि. २६.०८.२०१५ च्या पत्रान्वये कळविलेले दिसुन येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या भुमिकेशी सहमती दर्शवुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणुन दिले की, सदरची माहिती ही जवळपास ३२ वर्षापुर्वीची असुन त्रयस्थ पक्षाची आहे तसेच त्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. ही बाब विचारात घेऊन सदर अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील फेटाळण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र. 6491 दि. 23-12-

(अपील क्र.३१४६/२०१५)

(73)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३१९९/२०१५

श्री. बन्सीधर किसनराव शिंदे,
अक्षय निवास, क्रांती नगर, पाटोदा, जि. बीड-४१४२०४ : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल आयोगास पाठवावा अशी शिफारस कलम १९ (८) (क) अन्वये आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.११.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये श्री. बी. बी. मंडले यांच्या पदोन्नतीबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २३.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहितीचा अधिकार कायदा-२००५ अन्वये मागितलेली माहिती मुदतीमध्ये प्राप्त न झाल्याने" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

> "श्री. बी.बी. मंडले, सेवानिवृत्त प्राचार्य शासकिय अध्यापक विद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद यांची माहिती खालीलप्रमाणे मुळ सेवापुस्तिकेवरुन पाठविणे. १) संपुर्ण नांव २) जन्म दिनांक ३) जात प्रवर्ग ४) पदवी परिक्षा उत्तीर्ण वर्ष ५) बी. एड. उत्तीर्ण वर्ष ६) पदवीधर म्हणुन प्रथम नेमणुक दिनांक ७) पदोन्नतीच्या ठिकाणी रुजु दिनांक. श्री. बी. बी. मंडले यांची वर्ग-२ पदी झालेली पदोन्नती सेवाज्येष्ठतेनुसार झाली की नाही हे पडताळुन पाहणे बाबत."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

५. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी सदर आदेश संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावर बजावुन त्याची पोहच अभिलेख्यात जतन करावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.------------- 6347 दि.-------------- 26/11/16

(अपील क्र.३१९९/२०१५)

प्रत:

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(७९)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२५९/२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

श्री. प्रमोद त्रिंबकराव भालेराव, : अपिलार्थी
नृसिंह कॉलनी, गंगापुर, जि. औरंगाबाद-४३११०९

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, : उत्तरवादी
श्रीमती राजाबाई माधवलालजी धुत कन्या माध्यमिक व
उच्च माध्यमिक विद्यालय, गंगापुर, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), : उत्तरवादी
जिल्हा परिषद, औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ११.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत तसेच जन माहिती अधिकारी श्रीमती संजीवनी प्रमोद सोंनदे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. बी. पवार हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२१.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये राष्ट्रीय प्रज्ञाशोध गुणपत्रिकाबाबत (माहे नोव्हे. २०१४ ते डिसें.

२०१४ साठी बसलेल्या इ. १० वी च्या विद्यार्थीनी संदर्भात) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती देण्यास टाळाटाळ" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २२.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास मुदतीत माहिती न दिल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रकरणात अंतिम आदेश न दिल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

"१)राष्ट्रीय प्रज्ञा परिक्षेचे गुणपत्रक अद्याप पर्यंत विद्यार्थीनींना का दिलेले नाही? त्याबाबतचा लेखी खुलासा करुन सदरील गुणपत्रक देण्यात यावे. २) राष्ट्रीय प्रज्ञा परिक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थीनींची यादी साक्षांकित करुन देण्यात यावी. "

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मला माहिती मिळाली परंतु फार विलंबाने मिळाली, त्यामुळे माझ्या मुलीचे नुकसान झाले. मला माझ्या मुलीच्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षेचे गुणपत्रक वेळीच मिळाले असते तर, गुणांचे पुनर्मुल्यांकन करता आले असते असे आयोगासमोर कथन केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तीवाद केला की, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षेतील गुणांचे पुनर्मुल्यांकन होत नाही. तसेच त्यांना हवी असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित केल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर उपलब्ध करुन दिलेले नाही. प्रकरणाचे स्वरुप पाहता प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्यांचे स्तरावर सदर प्रकरण निकाली काढता आले असते. याठिकाणी

कलम ७ (१) व १९ (६) चा भंग दिसुन येत असल्याने त्यांचा खुलासा आयोगास आवश्यक वाटतो. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र. 6513 दि. 26-12-16

(अपील क्र.३२५९/२०१५)

(४०)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२७९/२०१५

श्री. प्रमोद त्रिंबकराव भालेराव, : अपिलार्थी
नृसिंह कॉलनी, गंगापुर, जि. औरंगाबाद-४३११०९

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, : उत्तरवादी
श्रीमती राजाबाई माधवलालजी धुत कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गंगापुर, जि. औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), : उत्तरवादी
जिल्हा परिषद, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १५.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०८.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत तसेच जन माहिती अधिकारी श्रीमती संजीवनी प्रमोद सोंनदे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. बी. पवार हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२१.०२.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये राष्ट्रीय आर्थिक सहायता परिक्षेस बसलेल्या इ. ८ वी ते १० वी

पर्यंतच्या विद्यार्थ्यांसदर्भात (माहे ऑक्टो. २०१४ ते डिसें. २०१४) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती देण्यास टाळाटाळ" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २२.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "विहित मुदतीत माहिती देण्यास मुद्दाम टाळाटाळ केलेली आहे." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

> "१) दि. ७.११.२०१४ चे राष्ट्रीय आर्थिक सहायता परीक्षा अर्जावर काय कार्यवाही केली आहे? या बाबतचा लेखी खुलासा देऊन सदरील अर्जाची व त्या सोबत जोडलेल्या कागदपत्रांची छयांकित प्रत साक्षांकित करुन देण्यात यावी. २) किती विद्यार्थीनी परीक्षेस बसल्या त्यांची यादी. ३) किती विद्यार्थीनी सदरील परिक्षा उत्तीर्ण झाल्या त्यांची यादी. ४) माझी मुलगी नामे कु. रोहिणी प्रमोद भालेराव इयत्ता १० वी हिचा या परिक्षेसाठी सहभाग शाळे मार्फत नोंदवला होता का? सहभाग नोंदवला असल्यास पुराव्यासह लेखी खुलासा करावा व सहभाग शाळे मार्फत नोंदवला नसल्यास का नोंदवला नाही त्याचा लेखी खुलासा पत्राद्वारे करावा."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २१.०२.२०१५ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी ही माहिती www.ncfeindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असते असा युक्तीवाद आयोगासमोर केला. तथापी ही बाब त्यांनी अपिलार्थीच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणत्याही प्रकारचे आदेश निर्गमित

केलेले नाही. याठिकाणी कलम ७ (१) व १९ (६) चा भंग झाल्याचे आयोगाचे निष्कर्ष असुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

---

जावक क्र.------------- 6514 दि.------------ 26-12-16

(अपील क्र.३२७९/२०१५)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२३३/२०१५

श्री. नारायण उत्तमराव मते, : अपिलार्थी
रा. देवहिवरा, ता. घनसावंगी, जि. जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, : उत्तरवादी
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, : उत्तरवादी
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २१.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २१.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. प. नं. बहुरे व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. द. रा. कहार हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०२.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जाक्र. २०१४/रामाआ/अपील/सीआर-२१४६/८२७९ दि. १०.११.२०१४ बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०६.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २७.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि. १२.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती मिळाली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"वरील निर्णयाच्या आदेशानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी, जि. जालना यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या खुलाश्याची साक्षांकित प्रत"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या माहिती अर्जानुसार आयोगाने द्वितीय अपील क्र. २१४६/२०१४ सुनावणी दि. २४.०९.२०१४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी, जि. जालना यांचा खुलासा अर्जाच्या तारखेपर्यंत अप्राप्त आहे असे दि. २५.०६.२०१५ अन्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यास सहमती दर्शवुन अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जानुसार वस्तुस्थिती कळविलेली असल्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची भुमिका योग्य आहे. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्यास पात्र असल्याचे आयोगाचे निष्कर्ष आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२१.११.२०१६**

जावक क्र. 6348 दि. 26/11/16

(अपील क्र.३२३३/२०१५)